शुक्रवार, २३ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२८०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • FRIDAY 23 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-280 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5


# मान्सून होणार आजपासून सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : बळीराजा चातकाप्रमाणे पावसाची वाट पाहत आहे. बिपरजॉयने देशभरातील पाऊस पळवला होता. बिपरजॉयमुळे दोन दिवसांपूर्वी गुजरात अन् राजस्थानमध्ये मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे अनेक ठिकाणी पूर आला होता. त्याचवेळी देशातील अनेक भागात उष्णतेची लाटही आली होती. आता जून महिन्याचा शेवटचा आठवडा सुरु होणार आहे. या आठवड्यापासून देशभरात मान्सूनची थांबलेली वाटचाल सुरु होणार आहे.**



महाराष्ट्रासह देशात शुक्रवार, २३ जूनपासून मान्सून सक्रीय होणार आहे. २३ जूनपासून पावसाला सुरुवात होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही भागात पाऊस मुसळधार पाऊस पडणार आहे. तसेच 24 ते 25 जूनपर्यंत पावसाचा जोर वाढणार आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

पहिल्या आठवड्यात म्हणजे २३ ते २९ जून दरम्यान मध्य भारतात चांगला पाऊस पडणार आहे. दुसऱ्या आठवड्यात म्हणजेच ३० ते ६ जुलै दरम्यान मान्सून भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर सक्रिय राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. ७ ते १३ जुलै अन् १४ ते २० जुलै या दोन आठवड्यात मान्सून देशभरात सक्रीय राहणार आहे. यामुळे जुलै महिना पावसाचा असणार आहे, असा अंदाज आहे. यंदा जून महिन्यात सर्वात कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे सर्वत्र पेरण्याही खोळबंल्या आहेत.

विदर्भात मान्सून आगमनाचा १३ वर्षांचा विक्रम तुटला आहे. विदर्भात मान्सून २३ जूनपासून दाखल होणार आहे. परंतु संपूर्ण विदर्भ व्यापण्यास आणखी चार ते पाच दिवस लागणार आहे, असा अंदाज नागपूर हवामान विभागाकडून वर्तवला आहे. उद्यापासून म्हणजेच २३ जूनपासून विदर्भाच्या काही भागात पूर्व मोसमी पावसाचा अंदाज नागपूर हवामान विभागाने वर्तवण्यात आला. यंदा पाऊस लांबल्यामुळे खरीप पेरणीचे गणित बिघडण्याची शक्यता आहे.

> सध्या मोसमी वाऱ्यांच्या प्रवासासाठी पोषक वातावरण तयार झाले असून मान्सून सर्वत्र सक्रिय झाल्याचे पाहायला मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांनीही पावसाचा अंदाज घेत पेरणीला सुरुवात करावी, अशा सूचना हवामान खात्याकडून देण्यात आल्या आहेत.



# मुधलवाडीत विहिरीला केमिकलयुक्त पाणी ?

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** तालुक्यातील मुधलवाडी एम.आय.डी.सी. येथील जवळपास १५ कंपनीने सांडपाण्याचे नियोजन योग्य पद्धतीने न केल्यामुळे मुधलवाडीतील कपन्यांशेजारील जुन्या वापरात असलेल्या विहिरीला पिवळे पाणी येवू लागल्याने गेल्या दहा वर्षांपासून या परिसरातील शेतकरी केमीकलयुक्त पाण्यामुळे पिके पिकत नसल्याने आर्थिक नुकसानीचा सामना करत आहे.

केमिकल युक्त पाणी कंपनीच्या बाजूला असलेल्या शेतात गेल्याने अनेक शेतकऱ्यांची जमीन बाधीत होऊन फळबाग व खरिप पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याची ओरड येथील शेतकऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात येथील शेतकऱ्यांनी या संदर्भातील विविध शासनाच्या विभागाला पत्र व्यवहार करून कळवले पण काहीच उपयोग झाला नसल्याने आता या परिसरातील शेतकरी पुन्हा अंदोलनाच्या माध्यमातून लढा उभारण्याच्या तयारीत असल्याने या शेतकर्यांना पाणी असुन शेती अथवा जनावरांना पिण्यासाठी विहीरचे पाणी वाफरता येत नसुन पाण्याचा वाफर केल्यास हाता पायाला खाजु येते तसेच पिकाची वाढच होत नसून अरोग्यावरही याचा गंभीर परिणाम होत आहे.

याप्रकरणी दि.२२ जून रोजी प्रत्यक्ष शेतकर्याच्या शेतात प्राथमिक बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान या बैठकीत विहिरीतील पाणी पाहणी, जमीन केमिकलयुक्त पाण्यामुळे जळण्याचा प्रकार, तसेच यापुढील कंपनी व शासनाकडे या केमिकलयुक्त पाण्याची विल्हेवाट लावावी अशी ठरले आहे. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष माऊली मुळे, तालुकाध्यक्ष शिवाजी धरपळे, सचिन बोडखे, काकासाहेब आढाव, विलास बोडखे, नंदकिशोर अढाव, बप्पासाहेब अढाव, रंगनाथ हजारे, भगवान बोडखे, दत्तात्रय जाधव, संजय जाधव, गणेश अढाव, गोपिचंद बोडखे, संजीवनी दिलवाले, आशाबाई बोडखे, करण बोडखे, सारंगधर हजारे उपस्थित होते.

# भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अमेरिकेची रेटिंग एजन्सी फिचने चालू आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी भारताचा जीडीपी ६.३ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. याआधी फीचने ६ टक्के जीडीपी राहील, असे म्हटले होते. जानेवारी-मार्च तिमाहीत चांगला विकास दर लक्षात घेता फिचने चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज काढला आहे. मागील आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये भारताचा विकास दर ७.२ टक्के होता. तर २०२१-२२ मध्ये देशाची अर्थव्यवस्था ९.१ टक्के दराने वाढली. फिचने म्हटले की,




भारतीय अर्थव्यवस्था व्यापकपणे मजबूत आहे. वर्ष २०२३ च्या जानेवारी-मार्च या पहिल्या तिमाहीत वार्षिक आधारावर ६.१ टक्के दराने वाढ झाली आहे. अलीकडच्या काही महिन्यांत वाहन विक्रीचे आकडे चांगले आले आहेत. याशिवाय पीएमआय सर्वेक्षण आणि क्रेडिट वाढ देखील मजबूत आहे. यामुळे आम्ही चालू आर्थिक वर्षातील विकास दराचा अंदाज ०.३ टक्क्यांनी वाढवून ६.३ टक्के केला आहे. अर्थव्यवस्थेच्या वाढीमुळे महागाई कमी झाली असून देशांतर्गत अर्थव्यवस्थेने वेग घेतला असल्याचे फिचने आपल्या अहवालात म्हटले आहे. फिचने म्हटले की, जानेवारी-मार्च जीडीपी वाढ अपेक्षेपेक्षा जास्त आहे आणि उत्पादन क्षेत्र सलग दोन तिमाहींच्या घसरणीनंतर सावरले आहे, बांधकामामुळे चालना मिळाली आहे आणि शेती उत्पादनात वाढ झाली आहे. खर्चाच्या संदर्भात, देशांतर्गत मागणी आणि निव्वळ व्यापारातील वाढीमुळे जीडीपी वाढ झाली.

# दुधात भेसळ करणाऱ्यांवर 'मोक्का'

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : दूध भेसळ करणारे आणि भेसळयुक्त दुध खरेदी करणाऱ्या खासगी किंवा सहकारी दूध संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असून त्यांच्यावर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. कठोर कारवाईमुळे भेसळयुक्त दूधाला आळा बसेल, असा दावाही विखे पाटील यांनी या वेळी केला. जिल्हाधिकारी कार्यालयात दुधाचा दर ठरविण्याबाबत आयोजित बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दुग्धविकास मंत्री विखे पाटील म्हणाले, की दुधामध्ये होणारी भेसळ हा प्रश्न गंभीर आहे. भेसळयुक्त दूध खरेदी करणाऱ्या दूधसंघ तसेच ज्या व्यापाऱ्यांसाठी भेसळ युक्त दूध तयार केले जात होते. त्यांच्याही गुन्हे दाखल करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. कठोर कारवाईमुळे दुधामध्ये भेसळ करण्याचे धाडस कोणी करणार नाही.

# अन्यथा संस्था, महाविद्यालयांना संलग्नता गमवावी लागेल

## चंद्रकांत पाटील : नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खासगी संस्थांना सहकार्य

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मातृभाषेतून शिक्षण, कौशल्य, रोजगार व व्यवसायाभिमुख शिक्षण, भारताच्या उज्ज्वल ज्ञानपरंपरेचा वारसा आणि नीतिमत्तेचे शिक्षण या चार मुख्य घटकांवर आधारित नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी २०२०) आहे. धोरण नीटपणे समजून घेत त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात संस्थाचालक व प्राचार्यानी पुढाकार घ्यावा. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी खाजगी संस्थांना मार्गदर्शन आणि आवश्यक सुविधा देण्यासाठी सहकार्य करू, असे मत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले. पुढील वर्षांपासून 'एनईपी २०२०' लागू न करणाऱ्या संस्थांना, महाविद्यालयांना संलग्नता गमवावी लागणार आहे, असा इशाराही त्यांनी दिला.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) व ११४ वर्षांची शैक्षणिक व सामाजिक परंपरा असलेल्या पुणे विद्यार्थी गृहाच्या वतीने संस्थाचालक व प्राचार्यांसाठी 'एनईपी २०२०'वर आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटनावेळी चंद्रकांत पाटील बोलत होते. 'उच्च शिक्षणाच्या खाजगी संस्थांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण राबविण्यात व्यवस्थापनाची भूमिका' अशी या चर्चासत्राची संकल्पना होती. चंद्रकांत पाटील म्हणाले, "मातृभाषेतून शिक्षणाला प्राधान्य दिल्यास विषय व संकल्पना समजून घेता येतात. विद्यार्थ्यांच्या शोधकवृत्तीला आणि सृजनशीलतेला चालना मिळते. संशोधनाला चालना मिळून बौद्धिक संपदा हक्क अधिक प्रमाणात मिळविता येतात. तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी विषयाची पुस्तके लवकरच मराठीतून उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

# कांदा अनुदान अर्ज अडकले तांत्रिक अडचणीत

## नाशिक जिल्ह्यातील ५५ हजार शेतकरी कांदा अनुदानापासून वंचित राहणार ?

आधुनिक केसरी न्यूज

निफाड : राज्य शासनाने फेब्रुवारी, मार्च महिन्यात कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ३५० रुपये अनुदान जाहीर केले आहे. त्यात ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली नाही त्यांना तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांचा संयुक्त दाखला जोडण्यास सांगितले मात्र याबाबत शासन निर्णयात स्पष्ट उल्लेख नसल्याने यासंदर्भातील तब्बल ५५९५७ अर्ज बाद झाले आहेत. त्यामुळे हे शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार आहेत.

शासनाने कांदा अनुदानासाठी सातबारा उताऱ्यावर ई-पीक पाहणीची अट घातली होती. मात्र ७० टक्के शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केलेली नसल्याने या अनुदानाचा शेतकऱ्यांना कवडीचाही फायदा होणार नसल्याने नाराजी पसरली होती. शेतकऱ्यांची नाराजी लक्षात घेता सरकारने समिती नेमून ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यकांचा अर्जासोबत संयुक्त पंचनामा अहवाल जोडावा असे सांगितले. मात्र तपासणी अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार शासन निर्णयात पंचनामा अहवालाबरोबर उताऱ्यावर नोंद असावी असे आदेश असल्याने हे सर्व प्रस्ताव आम्ही तूर्त बाजूला ठेवल्याचे सांगितले. ई-पीक पाहणी कालावधी उलटून गेल्यामुळे ऑनलाइन नोंद होत नाही तसेच तलाठ्यांना लेखी लिहिण्याचे आदेश नसल्याने सातबारावर नोंदी झाल्याच नाही. मग सरकारला हे प्रस्ताव नाकारायचेच होते तर मग शेतकऱ्यांना तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवकाच्या दारात चकरा कशाला मारायला लावल्या? त्यांना आर्थिक झळ कशासाठी पोहोचविली? तसेच शासनाचा त्यांच्याच कर्मचाऱ्यांवर विश्वास नाही का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. यातून शासनाला शेतकऱ्यांना फक्त वेड्यातच काढायचे आहे असेच दिसून येते. शासनाने हे प्रस्ताव विचारात घेतले नाही, तर मोठा असंतोष उफाळून येऊ शकतो.




> शासन निर्णयात पचंनामा अहवालासोबत सातबारा उताऱ्यावर नोंद असावी, असा उल्लेख असल्याने तूर्त असे प्रस्ताव बाजूला ठेवले आहेत. शासनाने स्पष्ट निर्देश दिल्यास हे प्रस्ताव पात्र होतील.
> **- फय्याज मुलाणी, जिल्हा उपनिबंधक**

> जिल्ह्यात कांदा अनुदानासाठी एकूण प्राप्त अर्ज - १ लाख ७८ हजार ८४९, तपासणी झालेले अर्ज - १ लाख २९ हजार ६६३, तपासणी अर्जापैकी पात्र अर्ज - ७३ हजार ७०६, अपात्र अर्ज - ५५ हजार ९५७

अजून पन्नास हजार अर्जांची तपासणी होणे बाकी आहे. तसेच खासगी बाजार समितीचे बारा तेरा हजार अर्ज येणे बाकी आहे. प्रस्ताव वेगवेगळ्या कारणाने अपात्र होत असले तरी संयुक्त पचंनामे अहवाल फेटाळल्यांची संख्या सर्वाधिक आहे. यामुळे अपात्र शेतकऱ्यांची संख्या सत्तर हजारांच्या पुढे जाऊ शकते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

असे प्रयोगशील संगीतकार होते हेमंतदां. गुरुदत्त निर्मित 'साहिब, बीबी और गुलाम' या चित्रपटाला हेमंतदांनी संगीत दिले आणि या चित्रपटाची गाणीही अफाट गाजली. या चित्रपटात त्यांनी गायिका आशा भोसले, गीतादत्त यांना संधी दिली. त्यांनीही त्या संधीचे सोने केले. त्या काळात संगीत आणि चित्रपट क्षेत्रात हेमंतदांइतका व्यस्त असणारा क्वचितच कोणी संगीतकार होता. हेमंतदाना बहुतेक वेळा कोलकाता ते मुंबई असा विमानप्रवास दररोज करावा लागे. एअर इंडियाने तर त्यांना 'डेली पॅसेंजर' हा किताब बहाल केला होता. फिल्मिस्तान स्टुडिओ बंद पडण्याच्या मार्गावर असताना हेमंतदांनी 'गीतांजली' स्टुडिओची निर्मिती केली. उत्तम चित्रपटांची निर्मिती करून संस्मरणीय अशी गीते आणि संगीत दिले. त्यांना रहस्यमय चित्रपटांची आवड होती. त्यांची संगीतबद्ध केलेली 'बीस साल बाद' मधील 'कहीं दीप जले कहीं दिल, 'कोहरा' मधील 'झूम झूम ढलती रात' या सारखी गाणी रसिक कधीच विसरू शकणार नाहीत. आज मान्यता आणि प्रतिष्ठा पावलेल्या अनेक गायक, गायिकांना हेमंतदांनी आपल्या चित्रपटातून गाण्याची संधी दिली. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या चित्रपटांमध्ये 'आनंदमठ', 'दुर्गेशनंदिनी', 'नागिन', ''ताज', साहिब बीवी और गुलाम', बीस साल बाद' बिन बादल बरसात, कोहरा, मिस मेरी, खामोशी इ चित्रपट प्रमुख आहेत. खामोशी चित्रपटाने तर त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली. या चित्रपटातील सगळीच गाणी गाजली. या चित्रपटातील लतादीदींच्या आवाजातील 'हमने देखी हैं इन आँखों की महकती खुशबू' हे गाणं म्हणजे मास्टरपीसच ! कितीही वेळा ऐकलं तरी कंटाळा येत नाही. याच चित्रपटातील हेमंतदांचं 'तुम पुकार लो..' आणि किशोर कुमार यांच्या आवाजातील 'वो शाम कुछ अजीब थी ..' ही सदाबहार गाणी तर आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. हेमंतदांना आपल्या कारकिर्दीत अनेक पुरस्कारांचे मानकरी ठरले. फिल्मफेअर पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच गायक म्हणून, संगीतकार म्हणून अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. रवींद्र भारती विश्वविद्यालयाने त्यांना सन्माननीय डी लिट प्रदान केली आहे. हेमंतदांनी मराठी चित्रपटातही काही गाणी गायिली आहेत आणि मराठी रसिकांची ती आवडती आहेत. हा खेळ सावल्यांचा या चित्रपटातील 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील काय' तसाच लतादीदींसोबत असलेलं 'मी डोलकर डोलकर दर्याचा राजा' ही गाणी कमालीची लोकप्रिय झाली. दर्यावरी रं, चालली होरी रं..., प्रीतीच्या चांदराती, प्रीती तुझी मनमोहिनी ही त्यांची मराठी भावगीते देखील लोकप्रिय आहेत. अशा या प्रतिभादत्त संगीतकार आणि गायकाचे २६ सप्टेंबर १९८९ रोजी हृदयविकाराचा झटका आल्याने कोलकाता येथे देहावसान झाले.



## तुम पुकार लो...



## आनंदी पहाट

## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्‌गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.



आधुनिक केसरी

### लोचननाने पाझरावे ||

पाझरावे पाषाणाने | दाविले हे नामयाने ||१||
विटेवरी उभा राहे | भक्तात हा दंग आहे ||२||
निनादे टाळ-मृदुंग | सावळाच भाव रंग ||३||
निर्गुण रूप अवघे | नाचू लागे संतांसंगे ||४||
आता सारा शीण गेला | चैतन्याला पूर आला ||५||
ब्रह्मसुख पांघरावे | लोचनाने पाझरावे ||६||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## विषयाकडचा ओढा भगवंताकडे लावावा

आधुनिक केसरी

प्रपंचात ज्याला विश्वास म्हणतात, त्यालाच परमार्थात श्रद्धा म्हणतात. उणीव हेच प्रपंचाचे रूप असल्यामुळे तो पूर्ण झाला असे कधीच होणार नाही. समाधान हा मात्र पूर्णत्वाचा स्वभाव आहे. निर्हेतुक कर्म करण्याने खरी सात्त्विकता उत्पन्न होईल, आणि पुढे पूर्णाहुती दिली जाईल. अशा प्रकारे ' सर्वस्व ' अर्पण करणे याचेच नाव यज्ञ होय. त्याग आणि भगवंताचे स्मरण हा यज्ञाचा खरा अर्थ होय. परमाार्थ साधला की बुवाचा देह पुष्ट होतो. तो काय दुधाचा रतीब लावतो ? छेः; भगवंताच्या आनंदाने त्याचा देह भरलेला असतो. परंतु साधकावस्थेमध्ये त्याचा देह कष्टामध्येच ठेवलेला असतो. खरे म्हणजे परमार्थी माणसाने दैन्यवाणे रहायचे कारणच नाही. पैसा असेल तर त्याने रोज श्रीखंडपुरी खावी; पण उद्या जर उपास पडला तर मात्र आजच्या पक्वान्नाची आठवण होता कामा नये. सर्वांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ सांगितला आहे. ज्याला हित करून घ्यायचे आहे त्याला गृहस्थाश्रमासारखा आश्रम नाही. पण लग्न करून सर्व काळ विषयांत घालवू लागलो आणि प्रपंचाची कर्तव्ये करायची



राहिली तर मग लग्न करून काय साधले ? उद्योग करून पोट भरायचे हे खरे, पण नोकरी करून मालकाला सर्वस्व मानू लागलो आणि देवाला विसरलो तर नाही उपयोग. देवाला स्मरून नोकरी करावी. गृहस्थाश्रमात देव भेटणार नाही असे जो म्हणेल त्याचे खरे मानू नये. देव भेटेल याची खात्री बाळगावी. आपला भार सर्वस्वी भगवंतावर टाकावा. संकट, आनंद दोन्ही भगवंताला सांगावीत. ज्या स्थितीत भगवंताने ठेवले आहे त्या स्थितीत समाधान मानावे. अर्पणबुद्धीने सर्व कर्मे करावीत. ज्यात माझे मन मला खात नाही ते काम चांगले असे समजावे. कोणत्याही मनुष्याला जोपर्यंत या प्रपंचामध्येच सर्व काही आहे असे वाटत असते तोपर्यंत तो परमार्थापासून दूर असतो. वाईट लोक समाधानात दिसतात, पण खरे ते तसे नसतात. वाईट कृत्ये करणाऱ्याला कधी ना कधी तरी पश्चात्ताप झाल्यावाचून राहत नाही. एखादी बाई आपल्या सावत्र मुलाला ज्याप्रमाणे खायला-प्यायला घालते पण आतून तिचे त्याच्यावर प्रेम नसते, त्याप्रमाणे आपण परमार्थाला वागवतो. खरे म्हणजे आपले इथेच चुकते. आपला ओढा जो विषयाकडे आहे, तो भगवंताकडे लावला की परमार्थ साधला. ज्याने विषयातले सुख भगवंताकडे लावले, म्हणजे भगवंताच्या स्मरणात ज्याला सुखा-समाधानाचा लाभ झाला, त्याचे जन्माला येऊन खरे कल्याण झाले. **आजचे बोधवचन आहे - १६०. प्रपंचात जी आपली चिकाटी आहे. तिच्या एकचतुर्थांश चिकाटी जरी भगवंतासाठी आपण धरली, तरी आपले काम भागेल. श्रीराम समर्थ**

## निरूपण

आधुनिक केसरी

**जगतो जननीं जप्त्वा प्राप्तुं किमवशिष्यते | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || २७ || जगाच्या जननीचा जप करून प्राप्त करण्याचे काय शिल्लक राहते ? म्हणून तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**माया जन साधक रहे, बाधक कबहुँ न होय । गृहि उत्तम सिद्धान्त है, कर्म भजन संग होय ।।३२।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल दशम अध्याय) ०४/१०/३२ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद**
: माया संतजनांची सहाय्यता करते तिच्या द्वारे त्यांना कधीही बाधा होत नाही. गृहस्थाश्रमात राहून परमेश्वराची भक्ती करणे हा सिद्धांत उत्तम आहे. गृहस्थाश्रमात कर्म आणि भक्ती एकाचवेळी होतात. हीच कर्मयोगाची विशेषता आहे.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी



आपण आता पर्यन्त अभ्यासल्या प्रमाणे,शेष,कुर्म,सात पाताळे एकवीस स्वर्ग,आठ दिक् पाळ तेहतीस कोटी देव यासर्व संकल्पना आपल्या हिंदू संस्कृती त आहेत आणि त्या ख-या आहेत. कारण जगातील कुठल्याही खंडाने किंवा देशाने आमच्या कडेपण अशी संस्कृती आहे असा आतापर्यंत दावा केलेला नाही. म्हणून भारतीय संस्कृती जगात भारी आहे. तिचे संवर्धन करणे तिच्या विचारांनुसार आचरण करणे हे प्रत्येक भारतीयाचं काम आहे."पुराणातील वांगी पुराणात"असे द्वेशयुक्त वाक्य कोणीही करू नये.कारणखुप अभ्यास पूर्वक व विचार पूर्वक ग्रंथ संपदा तयार केली आहे. त्याचा आदर करणे एक भारतीय नागरिक म्हणून तुमचे माझे आपल्या सगळ्यांचेच काम आहे. हां तर मित्रांनो भगवान विष्णुहजार फडा असलेल्या शेष नागावर माता लक्ष्मी सह विराजमान आहेत. कुर्म म्हणजे कासव हा भगवंताचा दुसरा अवतार होय. बारा अदित्य, अकरा रूद्र,न ऊ नाग, सात ऋषि,अनेक देवतांचे अवतार हे सर्व सत्य आहे. बारा अदित्य धातु, मित्र, अर्यमा, रूद्र,वरूण, सुर्य, भग, विवस्वत्, पूषन,सवित्र्, त्वष्टा व विष्णू ही सुर्याची बारा महिन्याची बारा रूपे आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**अर्थनाशं मनस्तापं गृहे दुश्चरितानि च ।बन्धनं चावमानं च मतिमान्न प्रकाशयेत् ॥ स्पष्टीकरण - पुष्कळ वेळा आपल्या आयुष्यात काही वाईट आणि विपरीत गोष्टी घडून जातात. त्या आपण गुप्त ठेवल्या पाहिजेत. त्या लोकांना सांगत सुटल्यास फायदा तर काही होत नाहीच; उलट लोकांत नाचक्की मात्र होते. लोकातली आपली पत जाते. म्हणून अशा गोष्टी उघड करू नयेत. मान सांगावा जनात, अपमान ठेवावा मनात- अशी म्हण आहे, ती लक्षात ठेवावी.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २३ जून २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# महाराष्ट्राचा मणिपूर करण्याचा भाजपा सरकारचा कुटील डाव : नाना पटोले

## राज्यातील ज्वलंत प्रश्नावरून लक्ष हटविण्यासाठी दंगली पेटवण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात मागील दोन-अडीच महिन्यात १० ठिकाणी दंगली घडवण्यात आल्या. या दंगलीमागे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा हात असून महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी या दंगली घडवल्या जात आहे. सत्तेच्या जोरावर महाराष्ट्राचा मणिपूर करण्याचा भारतीय जनता पक्षाचा कुटील डाव आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. यासंदर्भात पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यात अमरावती, अकोला, शेगाव, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूरसह १० ठिकाणी दंगली घडवण्यात आल्या. महाराष्ट्रात शाहु, फुले, आंबेडकर यांचा विचार खोलवर रुजलेला आहे म्हणून भारतीय जनता पक्षाचा हा कुटील डाव यशस्वी होऊ शकला नाही. राजर्षी शाहू महाराज यांच्या कोल्हापुरातही भाजपाने धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण भाजपाचे षडयंत्र जनता ओळखून आहे त्यामुळे हा डावही फसला.

राज्यातील जनतेने संयम पाळला आणि सामाजिक सौहार्द हा येथील मुलधर्म असल्याने असा षडयंत्राला जनता बळ पडत नाही. काँग्रेस पक्षाने राज्यातील कायदा सुव्यवस्थेसंदर्भात पोलीस महासंचालक व राज्यपाल यांची भेट घेऊन चर्चा केली पण कारवाईबाबत काहीच ठोस झालेले नाही. महागाई, बेरोजगारीसारख्या महत्वाच्या समस्या उभ्या असताना भाजपा सरकार त्यावर काहीच बोलत नाही व जनतेला दिलासा देणारे निर्णय घेत नाही. शेतकऱ्यांवर आस्मानी, सुलतानी संकटाचा सामना करावा लागत आहे, सरकार केवळ मदतीची घोषणा करते पण शेतकऱ्यांपर्यंत सरकारी मदत पोहचतच नाही. परवाच मुख्यमंत्र्यांनी १५०० कोटी रुपयांची मदत जाहीर केली पण आधी जाहीर केलेली मदत कुठे गेली ? शेतकऱ्यांना ती मिळालीच नाही. हे सर्व प्रश्न असल्याने सरकार त्यावरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी दंगली घडवण्याचा प्रयत्न करत आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



## जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यास बेदम मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणे शहरात धक्कादायक प्रकार घडला आहे. ज्या जिल्हाधिकाऱ्यांवर जिल्ह्याची जबाबदारी असते, कायदा अन् सुव्यवस्था राखण्याची महत्वाची भूमिका असते, त्यांच्याच कार्यालयात तुफान हाणामारी झाल्याचा प्रकार घडला आहे. ही मारहाण एका शेतकऱ्यास झाली आहे. अगदी रक्तबंबाळ होईपर्यंत ही मारहाण झाली आहे. एका वकिलाकडून शेतकऱ्यास मारहाण झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. पुणे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या कार्यालयाच्या परिसरात हा प्रकार घडला आहे. या ठिकाणी शेतकरी अन् वकील यांच्यात तुफान हाणामारी झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे दालन असलेल्या पाचव्या मजल्यावरच हा गोंधळ झाला आहे. या ठिकाणी शेतकऱ्याला रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील वाडेबोल्हाई येथील शेतकऱ्याला ही मारहाण झाली आहे. शेतकरी राजेंद्र दिनकर चव्हाण यांना एका वकिलककडून मारहाण झाली आहे. विरोधी पक्षकाराच्या वकिलाने आपणास दमदाटी केल्याचा आरोप शेतकरी राजेंद्र चव्हाण यांनी केला आहे तर आपण स्वसंरक्षणासाठी मारहाण केल्याचा दावा वकिलाने केला आहे.

वेली तालुक्यातील वाडेबोल्हाई येथील शेतकरी राजेंद्र चव्हाण यांना मारहाण सुरु असताना जमाव जमला होता. हा जमाव दोघांचे भांडण सोडवण्याचा प्रयत्न करत होता.

## समृद्धी महामार्गावर आता इंधन चोरट्यांची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** सततच्या अपघातामुळे मृत्यूमार्ग ठरलेल्या समृद्धी महामार्गावर आता इंधन चोरट्यांची दहशत वाढली आहे. महामार्गावर रात्री बेरात्री इतर वाहनांतील डिझेल चोरणाऱ्या सुसज्ज टोळ्यांचा मुक्त संचार आहे.बुलढाणा जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी मार्गावर अलीकडे तीन कारवाया करण्यात आल्या.

काल संध्याकाळी उशिरा संभाजीनगरमधील एका चोरट्यास पकडण्यात आले. अनिल संजय पवार ( २३, रा. निरगुडी खुर्द तांडा, ता. खुलताबाद जिल्हा संभाजीनगर ) असे चोरट्याचे नाव आहे. दुसरबीड ( ता सिंदखेड राजा ) नजीकच्या चॅनेल ३१९ वर असलेल्या त्याच्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर ( एमएच ०४ एफ आर ०५२१ ) वाहनातून डिझेलच्या ६ कॅन जप्त करण्यात आल्या. मात्र, त्याचे सहकारी इर्टिका वाहनासह फरार होण्यात यशस्वी झाले. रात्री गस्त घालणारे महामार्ग पोलिसांचे वाहन पाहून ते पसार झाले. पकडण्यात आलेल्या अनिल पवार याने ते त्याचे सहकारी असल्याचे सांगितले. गोपाल डहाळके, उमेश नागरे, सचिन सनासे, जयकुमार राठोड यांनी ही कारवाई केली.



## कार्यक्षम यंत्रचालक विद्युत वितरणाचा कणा : अभियंता राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महावितरणच्या वाळूज एमआयडीसी उपविभागामधील उत्कृष्ट सेवा देणाऱ्या यंत्रचालकांचा कार्यकारी अभियंता प्रेमसिंग राजपूत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मसिआ उद्योजक संघटनेचे उपाध्यक्ष अर्जुन गायकवाड व सचिव कमलाकर पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वाळूज एमआयडीसी उपविभागातील सर्व उपकेंद्रातील यंत्रचालकांच्या मागील दोन वर्षातील कामगिरीचा आढावा घेऊन डी-सेक्टर उपकेंद्र हे आदर्श उपकेंद्र तर एम-सेक्टर उपकेंद्र हे उत्कृष्ट उपकेंद्र म्हणून घोषित करण्यात आले. याप्रसंगी यंत्रचालक लक्ष्मण राठोड, साहेबराव पाटील, योगेश मकासरे, रवींद्र कदम, अब्दुल मुखीत, रामलाल राठोड, वाल्मिक निकम यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्युत उपकेंद्राचा यंत्रचालक हा महावितरणच्या विद्युतव्यवस्थेचा कणा असून त्यांनी स्वतः सुरक्षित राहून आपल्या सोबत काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांच्याही सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी कर्तव्याच्या वेळी सर्व यंत्रचालकांनी कायम दक्ष रहावे आणि सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे प्रतिपादन राजपूत यांनी केले. त्यामुळे महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी कायम दक्ष रहावे, अशी अपेक्षा यावेळी अर्जुन गायकवाड यांनी व्यक्त केली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते उपकेंद्रामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी वाळूज उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रवीण जोशी यांनी उपविभागातील सर्वच यंत्रचालकांच्या कामाचा गौरव केला तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी वितरण हानी कमी करून ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी कायम तत्पर राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी अभियंते रवी मिरगणे, जितेंद्र मालुसरे, विक्रांत खाडे, सरिता स्वामी, प्राजक्ता बर्डे, कृष्णा काळदाते, अमोल औताडे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जत, उमदी पोलिस हद्दीत अवैद्य धंद्यांनी गाठला उच्चांक

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** जिल्ह्याचा शेवटचे टोक असलेल्या जत तालूक्यात विशेषतः उमदी पोलिस ठाणे हद्दीत अवैद्य धंद्यांनी उच्चांक गाठला आहे. जत व उमदी पोलिसांना ही अवैद्य धंदे रोखण्यात मात्र सपशेल अपयश आले आहे असेच म्हणावे लागेल. किंवा केवळ आर्थिक व्यवहारातून या अवैद्य धंदेवाल्यांना अभय देण्याचे काम सुरू आहे याची शंका आहे. जत तालूक्यातील गैरव्यवहार व गैरकृत्य रोखले जावेत यासाठी तालूक्यात दोन पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली आहे. पण आता मात्र या पोलिस ठाण्याकडूनच काहीशा अलिखित स्वरूपात करार केल्यासारखे अवैद्य धंदे राजेरोसपणे सुरू आहेत. याविरोधात स्थानिक लोकप्रतिनिधीनी पोलिस ठाणेस लेखी तक्रारी देखील दिले आहेत मात्र पोलिस खाते यांच्यावर कारवाई करण्या एवजी त्यांचीच पाठराखण करताना दिसत आहे. जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक कृष्णप्रकाश साहेब असताना जिल्ह्यातील मटका, जुगार, बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यांच्यावर कारवाई करत जिल्ह्यातील अवैद्य धंदेवाल्याचे कंबरडे मोडले होते पण आज परीस्थिती

> माडग्याळ येथिल लोकप्रतिनीधीनी गावातील उमदी पोलीस ठाणेत गावातील अवैद्य धंदे बंद करण्याबाबत रितसर अर्ज देऊनही पोलिस यंत्रणेकडून कोणतीच प्रक्रिया केली नसल्याने माडग्याळ मधील लोकप्रतिनीधीनी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक मा . श्री . सुनिल फुलारी यांची भेट घेण्याचा निर्णय घेतला आहे .

वेगळी आहे. आज अवैद्य धंदेवाले पोलिसांच्या मांडीला मांडी लावून आपला व्यवसाय आर्थिक तडजोडीतून राजरोसपणे चालवित आहेत. पुर्व भागातील सर्व लहान मोठ्या गावात आज मटका अड्डे, तीन पानी जुगाराचे अड्डे, ऑनलाईन लॉटरी चालवणारे, आणि पानपट्टी व किराणा दुकानातून दारूची विक्री होतानाचे चित्र आहे. हे सर्व पोलिसांच्या नजरेसमोर होत असताना पोलिस मात्र गाधांरीच्या भुमिकेत केवळ त्यांच्याकडून हप्ते गोळा करून आपल्या बॅक खात्यातील रकमेत भर घालत आहेत. काही ठिकाणी तक्रारी करण्यास गेलेल्यानाच पोलिसांकडून अजब सल्ले दिले जाते. उलट तक्रारदारांनाच त्याच्यावर काही तोडगा नाही काही केला तरी ते बंद होणार नाही असे सल्ले दिले जाते. मग पोलिस खात्याचे नेमके काम काय असा प्रश्न पडत चालला आहे.



# सेहवागचा गौप्यस्फोट

आधुनिक केसरी

बीसीसीआय ही जगातील सर्वात बलाढ्या आणि श्रीमंत संघटना आहे. पण या बीसीसीआयचे नाव मोठे आणि लक्षण खोटे, अशीच अवस्था असल्याचे भारतीय संघाचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवागच्या वक्तव्यानंतर समोर येत आहे. सेहवागने यावेळी भारतीय संघाच्या निवड समितीबाबत एक मोठा गोप्यस्फोट केला आहे. WTC Final नंतर भारताच्या निवड समितीचे खरे रुप सर्वांसमोर आले. जिथे भारतीय संघात शंभरपेक्षा जास्त आंतरारष्ट्रायी सामने खेळलेले खेळाडू आहेत तिथे मात्र निवड समितीमध्ये एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळू न शकलेला व्यक्ती असल्याचे समोर आहे. त्याचबरोबर या निवड समितीमध्ये ५० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय सामने खेळलेला एकही खेळाडू नाही. त्यामुळे निवड समितीचे खरे रुप आता सर्वांसमोर आले आहे. पण बीसीसीआयला दिग्गज खेळाडू या निवड समितीसाठी मिळत नाहीत का, असा प्रश्न विचारला जात आहे. पण भारताच्या निवड समितीमध्ये दिग्गज खेळाडू का नाहीत, याबाबतचा गौप्यस्फोट आता सेहवागने केला आहे. सेहवाग म्हणाला की, "भारताचा संघ निवडण्यासाठी निवड समितीमध्ये नावाजलेले खेळाडू का नाही, असा प्रश्न सर्वांना पडला असेल. पण त्याचे कारणही तसेच आहे. बीसीसीआय निवड समिती सदस्यांना यापूर्वी मानधन देत नव्हती. दिलीप वेंगसरकर यांनी तर एकही पैसा न घेता निवड समितीचे अध्यक्षपद भूषवले होते. त्यानंतर के. श्रीकांत यांच्या काळात निवड समितीला मानधन द्यायला सुरुवात झाली. सध्याच्या घडीला निवड समिती अध्यक्षांना एक कोटी तर निवड समिती सदस्यांना ९० लाख रुपये मिळतात. जर दिग्गज खेळाडूंचा विचार केला तर ते कोणत्या ना कोणत्या संघाशी किंवा चॅनेलशी जोडलेले असतात आणि तिथे त्यांना जास्त मानधन मिळते. त्यामुळे कोणतेही दिग्गज खेळाडू निवड समितीकडे वळताना दिसत नाही." निवड समिती म्हणजे काटेरी मुकुट समजला जातो. पण तिथे काम करणाऱ्या दिग्गज व्यक्तींना भारतीय संघातील खेळाडूंपेक्षा कमी मानधन मिळते. बीसीसीआय जिथे खेळाडूंना ७ कोटी रुपये वर्षांसाठी देते, तिथे निवड समितीसाठी देण्यात येणारी रक्कम ही फार कमी असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे दिग्गज खेळाडू निवड समितीमध्ये सहभागी होत नाहीत.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# मानसिक गुलामी देशासाठी घातक

आधुनिक केसरी

**मानसिक गुलामी अत्यंत भयंकर असुन मानसिक गुलामी मुळे स्वतः चा परिवाराचा विकास तर होत नाही परंतु याचा परिणाम देशावरही होतो. माणसिक गुलाम नेमके म्हणायचे कोणाला आणि ते ओळखायचे कसे हा ही खुप महत्वाचा प्रश्न आहे. जे लोक स्वतः ची बुद्धी, मेंदु, तर्क आणि आधार याचा विचार न करता केवळ ठराविक व्यक्ती अथवा ठराविक समुदायातील लोक सांगतील तेच अंतीम सत्य आहे समजून वागतात ते माणसिक गुलाम होत. थोडक्यात काय तर मानसिक गुलाम हा फक्त शरीराने स्वतः चा असतो बाकी क्रीया आणि प्रतिक्रिया हा स्वतः च्या मनानुसार कधीच देत नाही.**

आपण ढोबळमानाने विचार केला तर यालाच मानसिक गुलाम म्हणु शकतो. मानसिक गुलामी मानसाला ज्ञान, सत्य, तर्क व स्वहितापासुन दुर नेऊन अज्ञान व आभासी दुनियेत ठेवते. गुलाम व्यक्तीचा वापर कधीही फक्त मालकाच्या हितासाठी व संरक्षणासाठी केला जातो अन्यथा गुलामांना काही किंमत नसते. बर मानसिक गुलामांना धर्म, जात, पक्ष,पंथ अस काही ही नसते. थोडक्यात काय तर प्रत्येक धर्मात, जातीत, पक्षात आणि पंथात माणसिक गुलाम आपल्याला आढळून येतात. माणसिक गुलाम फक्त अडाणी किंवा मध्यमवर्गीय लोक असतात का तर मुळीच नाही. शिक्षीत, सुशिक्षित, नोकरदार कर्मचारी, मजूर, बेरोजगार असे सर्वच जन माणसिक गुलामी मध्ये येतात. आणि याच माणसिक गुलामीचा फायदा स्वार्थी राजकारणी घेऊन देशाचे व लोकांचे वाटोळे करतात. याची जाणीव गुलामांना नसते कारण त्यांचा मेंदु, बुद्धी तर्क हे काहीच काम करत नाही. परंतु गुलामगिरी च्या माध्यमातून झालेले परिणाम त्याला भोगावे लागतात वाईट परिणामांना चांगले समजने हे पक्या मानसिक गुलामीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. याच मानसिकतेला मजबूत करून व मानसिक गुलामांना धर्म, व्यक्ती दाखवून पांखड, अज्ञात अंधश्रद्धेच्या आतून राजकीय पोळी भाजुन घेतली जात आहे. जनतेची दिशाभूल करून, जनतेला माणसिक गुलाम बनवून, जनतेच्या समस्या बाजूला सारून मिळवलेल्या सत्तेमधुन जनतेचे हित होईल अशी अपेक्षा करणे म्हणजे रेड्याकडून दुधाची अपेक्षा करणे होय. राजकीय नेते कोणतेही चुकिचे किंवा मानव हिताच्या विरोधात काम करायचे तर धार्मिक व सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात आणि गुलाम लोक राजकीय नेत्यांचे ऐकून पेटून उठतात म्हणून राजकीय लोकंचा उद्देश साध्य होतो परंतु पेटुन उठणारा तुरुंगात जातो याची जाणीव बऱ्याच लोकांना नसते. राजकीय नेते एखादे विधान, वक्तव्य करतात ते बरोबर आहे का हे तपासून न बघता केवळ मालकाने सांगितले म्हणजे खरे असेल म्हणून उतावळेपणा करणारे लोक गुलाम असतात यांचा वापर दंगली मध्ये केला जातो. दंगल करणाऱ्याचे आयुष्य उद्ध्वस्त होते आणि आणि दंगल घडवून आणणाऱ्या लोकांची मुले शिक्षण, उद्योगाच्या माध्यमातून भरभराट करतात. राजकीय नेत्यांचे एवढे गुलाम झालेले लोक आहे की आज सत्ताधारी व विरोधी पक्षातील नेत्यांच्या चुकिच्या कृतीवर सर्वसामान्य मानसांनी बोलाव कि नाही हा प्रश्न पडतो. एखाद्या नेत्या बद्दल किंवा सत्य परिस्थिती बद्दल बोलायला गेले की गुलमांची फौज सर्वसामान्य मानसावर तुटून पडते, आमचा नेता एकच, तुझी लायकी आहे का बोलण्याची ? आमचा नेता सांगेल तेच सत्य वगैरे वगैरे बोलुन सर्वसामान्य लोकांवर दबाव आणुन आवाज दाबण्याचा प्रयत्न गुलाम लोक करतात. बर हे कृत्य एकाच पक्षात आहे असे नाही. हे एकाच विचारसरणीत आहे असेही नाही. स्वतः ला पुरोगामी व वैचारिक समजणाऱ्या नेत्यांच्या सोबतही मानसिक गुलामांची फौज असते. माणसिक गुलाम दुसऱ्याची लायकी, इज्जत काढण्याच्या भाणगडीत स्वतः च पुर्ण उघडे होतात याचे भान नसते. अशा लोकांमुळे देशात शांतता सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आवाज दाबुन हक्क अधिकारावर बंधने येतात, शिक्षण आरोग्य रोजगार व महागाई यावर चर्चा होऊन तोडगा काढण्याऐवजी शीतयुद्ध, आणि कधी कधी दंगली सुद्धां होतात. अंधश्रद्धा, पाखंड, अज्ञान, थोतांडाचे समर्थन करून राजकीय नेते याचा संबध धर्माशी जोडून जनतेच्या भावनेशी



खेळतात व सामाजिक समस्या वाढवतात. ज्ञानी माणूस गप्प म्हणून अज्ञानी व पाखंड लोकांचे, वैचारिक व विचारवंत गप्प म्हणून अविचारी लोकांचे, धर्मनिरपेक्ष लोक गप्प म्हणून धर्मांध लोकांचे समतावादी लोक गप्प म्हणून विषमतावादी लोकांचे वजन वाढले आहेत. आणि गप्प बसलेले लोक केवळ, धर्म, नेता, आणि नातेसंबंध बघून गप्प असतील तर तेही गुलामच असतात. एखाद्या घटनेची बाबींची माहिती नसणे यात गैर असे काहीच नाही, परंतु एखादी गोष्ट आपल्याला माहिती आहे कि चुकीची आहे, आणि ती केवळ धर्म, व्यक्ती यांच्या साठी करत असू तर आपण स्वतः गुलमीमध्ये जात आहोत व आपल्याला गुलामी हवी हवी आहे असाच अर्थ निघतो. द्वेष, अंधश्रद्धा, पांखड, विषमता थोतांड याचा संबध कोणत्याही धर्माशी व पक्षाशी नसतो हे जेव्हा लोकांना कळेल तेव्हा आपण जागृती कडे जात आहोत हे दिसून येईल. परंतु आज गुलामांची संख्या एवढी वाढली कि आपण अंदाजही करू शकत नाही. येथे विज्ञानाला आव्हान करून अज्ञान पेरले जाते जनता अज्ञानाला सत्य माणते कारण धार्मिक व्यक्तीने सांगितले असते. परंतु यावर विज्ञानवादी लोक काहीच बोलत नाही. म्हणजे अज्ञान पेरतात आपले ज्ञान लवपून अज्ञानाचा प्रसार प्रचार होऊ देणे हे ही गुलामीचेच लक्षण आहे. आज अनेक डॉक्टर देशात तयार झाले आहेत. मोठमोठे हॉस्पिटल निर्माण केले. दोन तिन दिवस रुग्णांना भरती केले तर लाखोंचे बिल होते. असे डॉक्टर जेव्हा एखादा अडाणी, पाखंडी व्यक्ती गोमुत्राने किंवा मंत्रोपचाराने केल्याने आजार बरा होतो असे बोलून जनतेची लुट करतो, सरळ वैद्यकीय शास्त्राला आव्हान करतो तेव्हा वैद्यकीय शास्त्रात पारंगत लोक त्याला विरोध करत नसतील तर तेही गुलमाच आहेत हे सिद्ध होते. गोमुत्राने व मंत्रोपचाराने आजार दुर होत असतील तर लाखो रुपये खर्च करून हॉस्पिटलमध्ये रुग्णांना भरती करण्यात काय अर्थ आहे. राजकीय नेते व पाखंडी लोक सांगतील तेव्हाच पेटून उठायचे तर मेंदुचा वापर कशासाठी ? महिला अत्याचार, तरुणांच्या हत्या याला विरोध व हे थांबण्यासाठी आंदोलन केवळ राजकीय लोक सांगतात म्हणून करत असाल तर एक गोष्ट लक्षात घ्यायला पाहिजे महिला आपल्याही घरी असते तरुण आपल्या ही घरी असतो, दुसऱ्या वर अन्याय अत्याचार झाला तर राजकीय नेत्याच्या इशाऱ्यावर आपण काम करत असु आणि उद्या तिच घटना आपल्या घरी घडली तर ? गुलाम लोकांना चूक बरोबर काही माहिती नसते. त्यांना जेव्हा पेटवले तेव्हाच ते पेटतात म्हणून देशातील समस्या अजून गंभीर होत आहेत. याचे उदाहरण थोडक्यात पाहीले तर आफताब प्रकरणात रस्त्यावर येणारे लोक साने प्रकरणात गप्प ? स्टेटसवरून दंगल घडवणारे लोक छत्रपतींचा अवमान होतो तेव्हा गप्प ? गोरक्षकाला मारहाण होते म्हणून बोलणारे नांदेड, मुंबई हत्याकांडावर गप्प ? रंगावरून धर्म धोक्यात येतो म्हणून जाळपोळ, बायकॉट व वादग्रस्त विधान करणारे लोक आदीपुरुष मधून उघड उघड देवाचा अपमान होतो तेव्हा गप्प का ? औरंगजेब चा फोटो झलकवणाऱ्यांना देशद्रोही म्हणणारे कुरुलकर यांच्या वेळी गप्प का ? असे अनेक उदाहरणे आहेत. गुन्हेगार कींवा गुन्ह्याचे समर्थन मुळीच नाही पण दोन कृत्य सारखेच असतील तर एक कृत्याला जोर लाऊन विरोध आणि दुसऱ्या कृत्यावर एकही शब्द बोलायचा नाही याला माणसिक गुलामी म्हणतात. कारण साने, कुरूलकर, नांदेड मुंबई प्रकरणावरून मताची झोळी भरता येत नाही, यावर आवाज उठवला तर दोषी आपलेच आहेत म्हणून गप्प बसण्याला गुलाम म्हणतात. अशीच गुलामी सुरु राहली तर राजकीय नेते जनतेचा वापर स्वतः च्या संरक्षणासाठी करतील, देशात गुन्हेगारी व अराजकता माजेल, अनेक तरुणांवर गुन्हे दाखल होतील, शिक्षणाचे प्रमाण कमी होईल, गुणवत्ता कमी होईल, आणि अज्ञानी, पाखंडी धूर्त लोक ज्ञानी, विचारवंत यांच्या वर हुकुमत करतील. म्हणून कोणत्याही नेत्याच्या, पाखंडी, थोतांड माणसाच्या वक्तव्यावर गुलाम बनवून प्रतिक्रिया न देता मेंदू बुद्धी आणि तर्काच्या आधारावर विचार करून जनतेचे हित कशात आहे हे बघने बघुन प्रतिक्रिया ज्या दिवशी येईल त्या दिवशी आपण जागृत आहोत याची पावती मिळेल. हल्ली बहुतांश लोक तर गुलामीतच जगत आहेत म्हणून देशामध्ये सामाजिक समस्या वाढत आहेत.



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

# पाऊस लांबल्याने शेतकरी चिंताग्रस्त

आधुनिक केसरी

**यंदा सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल, असे भाकीत भारतीय हवामान खात्याने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. बीपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता २३ जूनला मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे. सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे.**

पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो ? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले पशुधन टिकवायचे कसे या विवंचनेत बळीराजा आहे. जर पाऊस वेळेत झाला नाही जनावरांना चारा मिळाला नाही तर देश देशातील दूध उत्पादन घटू शकते परिणामी त्याचा फटका दुग्धजन्य पदार्थांना बसू शकतो. एकूणच पाऊस वेळेत आणि पुरेसा आला नाही तर त्याचा फटका शेतीलाच नाही तर देशाच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो. देशाची अर्थव्यवस्था आता कुठे रुळावर येऊ लागली असताना हे संकट उभे राहिले असल्याने या संकटाला सामोरे जाण्यासाठी सरकारने आतापासूनच तयारी करायला हवी. मागील काही वर्षांपासून निसर्गचक्र बदलले आहे. पावसाचे प्रमाण आणि महिनेही बदलले आहेत. जेंव्हा नको तेंव्हा पाऊस पडतो आणि जेंव्हा गरज असते तेंव्हा दडी मारतो. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी पूर्ण करतो मात्र त्याचा आपल्या शेतीला काही उपयोग होत नाही उलट नुकसानच होते. देशातील कृषी क्षेत्र नेऋत्य पावसावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसतो. पावसाने हुलकावणी दिल्याने पिण्याच्या पाण्याचाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. ऐन जून महिन्यात अनेक गावांत टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. धरणातील पाण्याचा साठा संपत आल्याने अनेक ठिकाणी आठवड्यातून एकदा किंवा दोनदा पाणीपुरवठा होत आहे. जर ऐन पावसाळ्यात ही अवस्था असेल पुढील उन्हाळ्यात काय अवस्था असेल याची कल्पना जरी केली तरी अंगावर काटा येतो. अल निनोमुळे निसर्गचक्र बिघडले असे म्हटले जात असले तरी याला केवळ अल निनोच जबाबदार आहे असे नाही. याला आपण म्हणजे मानव देखील तितकेच जबाबदार आहे हे मान्य करावे लागेल कारण मानवाने कारण नसताना निसर्गावर अतिक्रमण केले. बेसुमार वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारली. जितके वृक्ष तोडले तितके वृक्ष लावले नाहीत या सर्व बाबी निसर्गाच्या लहरिपणास जबाबदार आहेत. आता तरी आपण सुधारायला हवे. वृक्षतोड थांबवायला हवी. निसर्गात मानवाचा होणारा हस्तक्षेप रोखायला हवा. सरकारनेही पाण्याचे योग्य नोयोजन करायला हवे. शेतकऱ्यांनीही मान्सूनच्या बदलत्या आलेखानुसारच शेतीचे नियोजन करायला हवे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# धर्माबादकरांची गांधीगिरी

## अप-डाऊन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा फुलं देऊन सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे येथे तहसील कार्यालय, भूमी अभिलेख, पंचायत समिती, रजिस्ट्री ऑफिस, कृषी कार्याललय,गट शिक्षण कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, तालुका आरोग्य विभाग, आय. टी.आय. व महाविद्यालय यासारखे विविध कार्यालय आहेत.

मात्र यातील बहुतेक कर्मचारी व अधिकारी नांदेड येथे स्थायिक असल्यामुळे येथील कार्यालय घड्याळीच्या काट्यावर नव्हे तर देवगिरी एक्सप्रेसच्या तालावर चालतात. गुरुवारी देवगिरी एक्सप्रेस दुपारी साडे बारा वाजता धर्माबादच्या रेल्वे स्थानाकावर पोहचली.

यामुळे तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात अप डाऊन करणारे कर्मचारी जवळपास एक वाजता आपल्या कार्यालयात पोहचले. या लेटलतीफ कर्मचाऱ्यांना पुष्पहार घालून गणेश गिरी, (शिवसेना उप जिल्हाप्रमुख,ठाकरे गट) अनिल कमलाकर (शहर प्रमुख शिंदे गट) पंडित पाटील जाधव, (तालुका अध्यक्ष स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड धर्माबाद) पुरी महाराज( शहर अध्यक्ष स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड धर्माबाद), स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड चे तालुका उपाध्यक्ष सुधाकर कुटूंरवार यांच्या सह अन्य कार्यकर्तेयांनी गांधींगिरी करत त्यांचा पुष्पहाराणे सत्कार केला. सध्या शेती आणि शिक्षण क्षेत्राशी निगडित विविध कागदपत्रे या कार्यालयातून काढावे लागत असल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक लोक तहसील कार्यालयात ताटकळत बसले होते.

मात्र धर्माबाद तहसील कार्यालयात जवळपास २१ लोकांचा स्टाफ असून केवळ सहा ते सात कर्मचारीच दुपारी एक वाजता पर्यंत उपस्थित होते. आणि तीन ते चार कर्मचारी देवगिरीने एक वाजता पोहचले. यामुळे संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी नायब तहसीलदारच्या खुर्चीला हार टाकले. देवगिरी ट्रेनने आलेल्या कर्मचाऱ्यांना पुष्पहार घालून सन्मान केले. याशिवाय पंचायत समिती कार्यालयातील स्थिती ही काही वेगळी नव्हती. घडलेला प्रकार लक्षात आल्यानंतर गट विकास अधिकाऱ्यांनी आठ जणांची अनुउपस्थिती लावली. खरं म्हणजे या काळात विद्यार्थी, शेतकरी, मजुर व कामगारांना आपल्या पाल्यासाठी व शेतीच्या योजनेसाठी अनेक कागद पत्रांसाठी शासकीय कार्यालयाचे खेटे मारावे लागतात. त्यात लेट लतीफ कर्मचाऱ्यामुळे लोकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यावर नियंत्रण आणावे अशी मागणी लोकातून होत आहे.

काही दिवसापूर्वी या अप डाऊन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले होते. यावर अंकुश बसविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी थम्ब मशीन बसविण्याच्या सूचना दिल्या होत्या .मात्र हे थंब मशीन अस्तित्वात आहेत का ? असेल तर या लेट लतीफ लोकांवर काही कारवाई होते का ? नसेल तर आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय गाठून हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आणून देऊ. **गणेश गिरी, शिवसेने उप जिल्हाप्रमुख,ठाकरे गट**

सध्याचा काळ शेतकरी व विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा असून या देवगिरी टू देवगिरी अप डाऊन करणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अधिकाऱ्यांनी याच्यावर कारवाई करावी.
**पंडित पा. जाधव, तालुका अध्यक्ष स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड धर्माबाद**





# वेदांता-फॉक्सकॉन घालवला, मायक्रॉन तरी महाराष्ट्रात आणा

## नाना पटोलेंचं मुख्यमंत्री शिंदेंना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य गुंतवणुकीसाठी देशात आघाडीचे राज्य आहे. परदेशी गुंतवणुकीसाठीही महाराष्ट्र आजही पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. मागील वर्षात काही महत्त्वाचे प्रकल्प राज्याबाहेर गेले. मात्र आता एक संधी महाराष्ट्रासाठी चालून येत आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाने २२ हजार कोटी रुपयांच्या मायक्रॉन सेमीकंडक्टर चिप निर्मिती प्रकल्पाला मंजुरी दिली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात यावर शिक्कामोर्तब होईल. मायक्रॉन प्रकल्पाची गुंतवणुक महाराष्ट्रातच व्हावी यासाठी राज्य सरकारने सर्वतोपरी प्रयत्न करावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणतात की, महाराष्ट्रात येणारा वेदांता फॉक्सकॉनचा सेमीकंडक्टर चीपचा प्रकल्प गुजरातला गेला. या प्रकल्पाच्या माध्यमातून १.५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार होती व लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार होते. तसेच पूरक उद्योगांमधूनही मोठया प्रमाणात रोजगार मिळणार होते पण हा प्रकल्प गुजरातला गेल्यामुळे महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे. ते नुकसान भरून काढण्यासाठी मायक्रॉन प्रकल्पाची गुंतवणुक महाराष्ट्रात व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रयत्न करायला हवेत. महाराष्ट्रातील पुणे परिसरात या प्रकल्पासाठी अत्यंत अनुकुल वातावरण आहे. पुणे हे औद्योगीक क्लस्टर असून विमानतळ, बंदरे आणि रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे ठिकाण आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ, त्यांना आवश्यक सोयी सुविधा या परिसरात उपलब्ध आहेत. त्यामुळे गुंतवणूक करणा-या कंपनीसाठी इथे प्रकल्प लवकर उभा करून उत्पादन सुरु करणे सोपे होणार आहे.

# जनसंवादातून आरोग्य विषयक प्रश्न मार्गी : राजपूत

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यासाठी सामाजिक कृती प्रक्रिया या अंतर्गत तालुका स्तरीय आरोग्य जनसंवाद या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मार्गी लागून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र व ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने अनेक सुविधा ग्रामीण भागातील नागरिकांना मिळत असून ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालय यांचे प्रश्न सुटण्यास साहाय्य होत आहे, असे प्रतिपादन जिल्हाआरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी मराठवाडा ग्रामीण विकास संस्था व राज्य समन्वयक संस्था -साथी सह पुणे यांच्या व तालुका आरोग्य अधिकारी यांनी बोलविलेल्या तालुका स्तरीय जन संवाद कार्यक्रमात केले. अध्यक्ष स्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ,गुरुनाथ इंदूरकर होते,जिल्हा समन्वयक अन्नपूर्णा ढोरे यांनी तालुक्यातून प्राथमिक आरोग्य केंद्र,उपकेंद्र,व ग्रामीण रुग्णालयाबाबत आलेल्या सूचना व तक्रारी सादर केल्या ,या तक्रारी चे तालुका आरोग्य अधिकारी ,वैद्यकीय अधिकारी,बांधकाम खात्याचे अभियंता यांनी निवारण करून त्रुटी ची पूर्तता आठ दिवसात करण्यात येईल असे आश्वासन दिले, जन आरोग्य समिती सर्व केंद्र व उपकेंद्रांची लवकर गठीत करावी, पुरेसा आरोग्य कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा, रुग्णालय इमारती त्वरीत दुरुस्त कराव्यात, रुग्णांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे,आलेला निधी ज्या कामासाठी आला,त्याच कामासाठी खर्च व्हावा ,रुग्णवाहिका दुरुस्ती करावी.

# देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदींना अमेरिकेला जायला वेळ आहे, मात्र मणिपूर जळते तिकडे जायला वेळ नाही, असे वक्तव्य उद्धव ठाकरेंनी १९ जून च्या भाषणात केले होते. तसेच मोदींनी लस तयार केली हे फडणवीसांचे वाक्य दाखवत त्यांची खिल्ली उडवली होती. या सगळ्याचा आज देवेंद्र फडणवीस यांनी समाचार घेतला. मातोश्रीपासून वरळीपर्यंत जे गेले नाहीत ते मोदींना मणिपूरला जा हे कोणत्या अधिकारात सांगत आहेत ? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. योगासने आणि योग करणे ही आपली पारंपरिक पद्धती आहे जी २०० पेक्षा जास्त देशांनी स्वीकारली आणि २१ जूनच्या दिवशी योगा दिवस साजरा झाला. आज आपण पाहतो आहोत मोदींनी देशाच्या विकासात सामान्य माणसाला भागीदार केले. विकास करताना गरीब कल्याणाचा अजेंडा मोदींनी राबवला. त्यामुळेच आपण पाहतोय मोदीजी अमेरिकेला गेले तर महाराष्ट्रातले एक नेते म्हणाले की आमचे विश्वगुरु अमेरिकेला चाललेत त्यांना मणिपूरला जायला वेळ नाही. मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की मणिपूर सांभाळायला आमचे गृहमंत्री अमित शाह पुरेसे आहेत. तुम्ही मातोश्रीपासून वरळीपर्यंतही गेला नाहीत इकडे मोदीजींना सांगता अमेरिकेला न जाता मणिपूरला जा. हे सांगण्याचा तुम्हाला अधिकार आहे का ? असा माझा त्यांना सवाल आहे. मोदीजींनी महाराष्ट्राला काय दिले ? मोदीजींनी कोव्हिडची प्रतिबंधात्मक लस तयार केली. परवा मी म्हटले कोव्हिडची लस मोदींनी तयार केली तर उद्धव ठाकरेंना खूपच झोंबले. ते म्हणाले की लस काय मोदी तयार करतात का ? मग उद्धव ठाकरे रोज सांगायचे मी राज्य चालवतो म्हणजे काय ते घोड्यावर किंवा रथावर बसून हाकत होते का ? की बैलबंडी हाकत होते ? मी तर म्हणेन होय मोदींनीच लस तयार केली. याचं कारण असं आहे जगातल्या पाच देशानींच लसी तयार केल्या. या लसींचं जे रॉ मटेरिअल होतं ते दोन ते तीन देशांकडेच होतं. दुसऱ्या देशांना ते मिळत नव्हतं. मात्र मोदींचे जे चांगले संबंध इतर देशांशी आहेत त्यामुळे ते आपल्याला मिळालं. ते स्वतः त्या शास्त्रज्ञांकडे गेले मोदीजींनी त्यांना १८०० कोटी रुपये दिले आणि लस तयार करुन घेतली. त्यानंतर भारतात १४० कोटी लोकांना मोदींनी मोफत लस दिली. महाराष्ट्रात साडेसतरा कोटी लसी मोफत मोदींनी पाठवल्या. कोव्हिडची लस दिली नसती तर आपण इथे बसू शकलो असतो का ? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी विचारला आहे.




महाराष्ट्र Business Katta












# मोदींच्या अमेरिका भेटीचे महत्त्व



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ ते २४ जून या कालावधीत अमेरिकेच्या महत्त्वाच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. त्याचवेळी पंतप्रधान मोदींची ही भेट भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. मोदींच्या अमेरिका भेटीने उभय देशांतील संबंध अधिक दृढ होतील.एवढेच नव्हे तर मोदींच्या अमेरीका भेटीने एक नवा अध्याय लिहिला जाईल,अस जाणकारांना वाटते.पंतप्रधान मोदींचा अमेरिका दौरा हा भारत-अमेरिका संबंधांमधील एक ऐतिहासिक क्षण म्हणून पाहिला जात आहे, ज्यामध्ये संरक्षण आणि गंभीर तंत्रज्ञानासह सर्व क्षेत्रांमध्ये अधिक चांगल्या सहकार्यासाठी अनेक करारही अपेक्षित आहेत. विशेष म्हणजे २०१४ नंतर पंतप्रधान मोदी सहाव्यांदा अमेरिकेच्या दौऱ्यावर जात आहेत. यादरम्यान त्यांनी बराक ओबामा, डोनाल्ड ट्रम्प आणि जो बिडेन यांच्यासह अमेरिकेच्या तीन राष्ट्राध्यक्षांची भेट घेतली आहे.**

दुसरीकडे, आज म्हणजेच २० जून रोजी न्यूयॉर्कला पोहोचल्यावर, अँड्र्यूज एअर फोर्स बेसवर भारतीय अमेरिकनांकडून त्यांचे जोरदार स्वागत केले जाईल अशी अपेक्षा आहे. यावेळीही ही भेट महत्त्वाची आहे कारण पंतप्रधान मोदी दुसऱ्यांदा अमेरिकन काँग्रेसला संबोधित करणार आहेत. ऐतिहासिक भाषण देण्यासाठी त्यांना प्रतिनिधीगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांनी आमंत्रित केले आहे.याआधी केवळ दोनच नेते हे करू शकले असून त्यात ब्रिटनचे माजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल आणि दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष नेल्सन मंडेला यांच्या नावांचा समावेश आहे.भारत यांच्यातील सह-विकास आणि सह-उत्पादनाच्या मुद्द्यावर स्पष्ट धोरणात्मक योजना तयार करणे हे या भेटीचे प्राधान्य असेल.भारताच्या स्वदेशी संरक्षण औद्योगिक पायाभूत सुविधांचे बळकटीकरण तसेच लष्करी आधुनिकीकरणाला गती देणे हे पंतप्रधान मोदींचे प्राधान्य आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन आणि त्यांचे भारतीय समकक्ष अजित डोवाल यांनी या वर्षी जानेवारीमध्ये तंत्रज्ञानासाठी एक महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे. (ICET) यूएस आणि भारत यांच्यातील तंत्रज्ञान सहकार्याला चालना देण्याचे उद्दिष्ट आहे आणि संरक्षण क्षेत्र हा या उपक्रमाचा एक अतिशय मजबूत घटक आहे ज्याचा दोन्ही देश पाठपुरावा करू इच्छित आहेत. जागतीक पातळीवर चीनची वाढते प्रभुत्व बघता अमेरिका व भारताला एकत्र.येण्याची व चीन विरोधात.आघाडी प्रस्थापित करण्याची गरज आहे.जागतिक स्तरावर चीनचे नियंत्रण आणखी वाढेल आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत आणि अमेरिकेसारख्या समविचारी देशांना एकत्र यावे लागेल. हे लक्षात घेऊन दोन्ही देश एकत्र येत आहेत आणि पुढेही जात राहतील.

भारत-अमेरिकन संबंधांमधील विशेष गोष्ट म्हणजे दोन्ही देशांतील सरकार किंवा पक्ष कोणताही असो, ते द्विपक्षीय संबंधांच्या बाबतीत पुढे गेले आहेत. जॉर्ज बुश असो वा ओबामा किंवा ट्रम्प किंवा बिडेन, त्यांनी संबंधांना प्राधान्य दिले आहे. मोदी पंतप्रधान झाल्यानंतरही अमेरिकेने त्यांना व्हिसा देण्यास नकार दिल्याने त्यांच्यातील कटुता दिसून येईल, अशी भीती होती, पण पंतप्रधान मोदी ती गोष्ट अत्यंत शालीन पद्धतीने विसरले. २०१४पासून आजपर्यंत तो इथपर्यंत पोहोचला आहे, दोन्ही देश संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक आहेत, दोन्ही देशांचे प्रमुख उत्सुक आहेत आणि भारत-अमेरिका संबंध नव्या उंचीवर पोहोचतील अशी अपेक्षा करायला हवी.

बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत आणि अमेरिका अधिकाधिक जवळ येत आहेत. परराष्ट्र धोरणांतर्गत मुत्सद्देगिरी सांगते की, दर्जा वधारत असणाऱ्या आणि उज्ज्वल भविष्याची मोठी शक्यता असणाऱ्या देशाशी असणारे संबंध सतत दृढ व्हायला हवेत. आज भारताची जागतिक परिस्थिती अशीच आहे.



त्यामुळेच जगातील सर्वात मोठ्या शक्तीलाही भारतासोबतचे संबंध सुधारायचे आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या प्रशासनाकडून अशी अनेक विधाने अलीकडे समोर आली आहेत, ज्यावरून अमेरिकेला भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यात रस असल्याचे स्पष्ट होत आहे. थोडक्यात, अमेरिकेसाठी भारताचे महत्त्व वाढत आहे.

अमेरिकन प्रशासनाच्या ताज्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून भारत अत्यंत महत्त्वाचा आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे मुख्य उपप्रवक्ते वेदांत पटेल यांनी म्हटले आहे की, अमेरिकेसाठी भारत अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचा भागीदार आहे. त्यांच्या मते व्यापार, सुरक्षा, सहकार्य आणि तांत्रिक सहकार्य आदी क्षेत्रांमध्ये अमेरिकेला भारताचे विशेष महत्त्व जाणवते. गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बायडेन यांच्यात जपानमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान एआय, क्वाटंम कॉंप्युटिंग, फाईव्ह जी, सिक्स जी, बायोटेक, स्पेस आणि सेमीकंडक्टर्स यांसारख्या क्षेत्रात दोन्ही देशांचे सरकार शिक्षण आणि उद्योग यासंदर्भात मजबूत संबंध प्रस्थापित करण्यावर भर देईल, असे निश्चित झाले आहे. साहजिकच येत्या काळात प्रगत तंत्रज्ञानाच्या मुद्द्यावर दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढेल आणि हार्डवेअर क्षमतेमध्ये गुंतवणुकीच्या शक्यताही चांगल्या असतील. येत्या काळात दोन्ही देशांदरम्यान शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल घडवून आणणाऱ्या क्वांटम तंत्रज्ञानावर चर्चा होणार आहे. उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त रोडमॅप बनवण्याबाबत एक करार होणे अपेक्षित आहे. या उपक्रमाद्वारे दोन्ही देश एकमेकांच्या अनुभवांचे आदानप्रदान करून अंतराळ तंत्रज्ञानामध्ये सहकार्य वाढवतील. सीमावादात अमेरिका भारतासोबत आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर चीनच्या कोणत्याही प्रक्षोभक कारवाईच्या विरोधात असल्याचे अमेरिकेने अनेकदा स्पष्ट केले आहे. डिसेंबर २०२२ मध्ये अमेरिकेने अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील स्थिती बदलण्याच्या चिनी लष्कराच्या प्रयत्नांना चुकीचे म्हटले होते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील चिनी सैन्यासोबत भेट घेतल्याच्या वृत्तानंतर पटेल यांनी पुन्हा एकदा म्हटले आहे की, अमेरिका सीमेपलीकडून किंवा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्करी किंवा नागरी घुसखोरी खपवून घेणार नाही. बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत आणि अमेरिका अधिकाधिक जवळ येत आहेत. परराष्ट्र धोरणांतर्गत मुत्सद्देगिरी सांगते की, दर्जा वधारत असणाऱ्या आणि उज्ज्वल भविष्याची मोठी शक्यता असणाऱ्या देशाशी असणारे संबंध सतत दृढ व्हायला हवेत. आज भारताची जागतिक परिस्थिती अशीच आहे. त्यामुळेच जगातील सर्वात मोठ्या शक्तीलाही भारतासोबतचे संबंध सुधारायचे आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या प्रशासनाकडून अशी अनेक विधाने अलीकडे समोर आली आहेत, ज्यावरून अमेरिकेला भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यात रस असल्याचे स्पष्ट होत आहे. थोडक्यात, अमेरिकेसाठी भारताचे महत्त्व वाढत आहे. अमेरिकन प्रशासनाच्या ताज्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून भारत अत्यंत महत्त्वाचा आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे मुख्य उपप्रवक्ते वेदांत पटेल यांनी म्हटले आहे की, अमेरिकेसाठी भारत अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचा भागीदार आहे. त्यांच्या मते व्यापार, सुरक्षा, सहकार्य आणि तांत्रिक सहकार्य आदी क्षेत्रांमध्ये अमेरिकेला भारताचे विशेष महत्त्व जाणवते. गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बायडेन यांच्यात जपानमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान एआय, क्वाटंम कॉंप्युटिंग, फाईव्ह जी, सिक्स जी, बायोटेक, स्पेस आणि सेमीकंडक्टर्स यांसारख्या क्षेत्रात दोन्ही देशांचे सरकार शिक्षण आणि उद्योग यासंदर्भात मजबूत संबंध प्रस्थापित करण्यावर भर देईल, असे निश्चित झाले आहे. साहजिकच येत्या काळात प्रगत तंत्रज्ञानाच्या मुद्द्यावर दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढेल आणि हार्डवेअर क्षमतेमध्ये गुंतवणुकीच्या शक्यताही चांगल्या असतील. येत्या काळात दोन्ही देशांदरम्यान शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल घडवून आणणाऱ्या क्वांटम तंत्रज्ञानावर चर्चा होणार आहे. उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त रोडमॅप बनवण्याबाबत एक करार होणे अपेक्षित आहे. या उपक्रमाद्वारे दोन्ही देश एकमेकांच्या अनुभवांचे आदानप्रदान करून अंतराळ तंत्रज्ञानामध्ये सहकार्य वाढवतील. सीमावादात अमेरिका भारतासोबत आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर चीनच्या कोणत्याही प्रक्षोभक कारवाईच्या विरोधात असल्याचे अमेरिकेने अनेकदा स्पष्ट केले आहे. डिसेंबर २०२२ मध्ये अमेरिकेने अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील स्थिती बदलण्याच्या चिनी लष्कराच्या प्रयत्नांना चुकीचे म्हटले होते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील चिनी सैन्यासोबत भेट घेतल्याच्या वृत्तानंतर पटेल यांनी पुन्हा एकदा म्हटले आहे की, अमेरिका सीमेपलीकडून किंवा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्करी किंवा नागरी घुसखोरी खपवून घेणार नाही.

# कळत नकळत



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**भर दुपारची वेळ होती. ऊन रणरणत होते. साधे झाडाचे पानही हालत नव्हते. वाऱ्याची छोटी तरी झुळूक यावी असं वाटत होतं. अंगातून घामाच्या धारा पाझरत होत्या. बँकेसमोर लोकांची बरीच गर्दी दिसत होती. लांबच लांब रांग आत जाण्यासाठी उभी होती.काही लोकांना उन्हाचा तडाका सहन होत नव्हता म्हणून ती सावली शोधत होती. तर काहीजण जीवाला थोडा थंडावा मिळावा यासाठी उसाचा रस पीत होती. बाजूच्या झेरॉक्स सेंटरमध्ये बरेच लोक उभे होते. सावलीत बसलेली वयस्क मंडळी आपआपसात काहीतरी बोलत होती. तो संवाद माझ्याही कानावर पडला. नुसतंच ऊन तापतय, जीवाची लईच तगमग झाल्या राव.किती पाणी पिलं तरी तहान काही भागत नाय. सोबत आणलेल्या बाटलीतीलं पाणी पण गरम झालंया. पोरगं म्हणतय जरा वेळ दम काढा. तुमची सही लागायची हाय म्हणून आणलया. कवा नंबर यायचा कुणास ठाऊक.**

बहुतेक मार्च महिना अखेरअसल्याने एवढे लोक जमले असतील असं मी मनाशीच म्हणत रांगेत उभी राहिले. रांग हळूहळू पुढे सरकत होती. माझे सहज लक्ष बाजूला ठेवलेल्या बाकडयाकडे गेले. त्या बाकड्यावर साधारण ऐंशीच्या घरातील आजी बसल्या होत्या. अंगावर पिवळ्या रंगाची नऊवारी चापून चोपून नेसलेली साडी. केसांचा अंबाडा, त्यावर माळलेले गुलाबाचे फुल. डोळ्यावर मोठया गोल भिंगाचा चष्मा.हातात शिवलेली कापडी नक्षीदार पिशवी.हातात पासबुक घेऊन त्या काहीतरी पाहत होत्या. एका चाळीशीतल्या माणसाला प्रश्न विचारत होत्या. पण ती व्यक्ती त्यांना उत्तर देताना म्हणत होती, आजी तुम्ही आतल्या साहेबांना विचारा. मला नाही सांगता येणार. त्यावर त्या लगेच म्हणाल्या
"होय बाबा त्यासाठीच इथंवर आलीया.लई चालणं होत नाय म्हणून रिक्षा केली बघ .दोनशे रुपये घेतले रिक्षावाल्या पोरानं. असू देत त्याचं बी घर चाललं पाहिजेच की ."
मी बँकेत गेले.काही कागदपत्राची पूर्तता करत होते, तेवढ्यात त्या आजीही आत आल्या आणि म्हणाल्या, "अहो या टेबलावरचं साहेब कुठं गेल्याती".
दुसऱ्या टेबलावर बसलेल्या व्यक्तीकडे पाहून त्यांनी प्रश्न केला. ते म्हणाले "ते साहेब आज रजेवर आहेत. काम काय आहे आजी तुमचे त्यांच्याकडे."
त्यावर त्या लगेच म्हणाल्या, "त्याना विचारायचं होतं. माझ्या ठेवलेल्या पावतीचं एवढं पैसं कमी कसं आलं म्हणून. लगेच ते संबंधित म्हणाले,
" आजी कोणते पैसे कमी आले तुमचे."
आधीच घामाघुम झालेल्या आजीनी पदारानं कपाळावरचा ओघळणारा घाम पुसला. समोर ठेवलेल्या खुर्चीवर बसत त्या म्हणाल्या,
"अवं मी मागच्या वक्ताला आली तवा माझी ठेव पावती मध्येच मोडली होती.दोन महिने अजून मुदत संपायला बाकी होतं. त्याला बी कारण झालं.माझ्या डोळ्याचं ऑपरेशन करायचं होतं. दीड लाख रुपय ठेवलं होतं. पण व्याज लईच कमी मिळाल्यासारखं वाटतंया. तवा सोबत नातू आला होता. मोतिबिंदू वाढल्याने मला लई दिसत नव्हतं. त्यानंच समधं पैसं मोजलं होतं.म्या बरी झाल्यावर हिशोब केला तर जुळत नाय.नातू तर म्हणतोय तेवढंच आल्यात. म्हणून मनातली शंका काढाया आल्या बघा, बाकी काहीसुदीक नाय. तिथे थांबलेला एकजण म्हणाला,
"आजी नीट मोजले होते का पैसे घेतल्यावर तेंव्हा." ?
"मी नाय नातवाने मोजलं होतं.
तो म्हणाला बरोबर हायती.म्या काही लक्ष दिलं नाय. दुसऱ्या दिवशी लगेच डोळ्याचं ऑपरेशन केलं. त्या गोंधळात राहून गेलं.नाहीतर मी माझी कामं स्वतःच करत्या.काय सांगू लेका तुला. काळ्याचं पांढरं उगाच नाय झालं . लई सोसून इथवर आलीया. म्हातारपणी गरजेला होतील म्हणून चार पैसं जपून ठेवलं होतं. दोन पोरं हायती.सगळं सुरळीत लावलंय त्याचं. पर सवतं राहत्याती.माझी ही काळजी घेत्याती पर आताच्या नवीन पोरींना म्हातारी माणसं नको वाटत्याती.म्या हे हेरून आधीच तजबिज करून ठेवली होती. हात पाय



चालत्यात तवर ठीक हाय. घासभर तुकडा हातानं खाता येईल. मी देवाला म्हणतेय उठा उठी मला मरण दे. कोणाला भार नको , कोणाकडून सेवा नको. पण त्याच्या मनात हाय तसंच घडणार नव्ह.दुखल्या खुपल्यावर दवापाणी करायला,आपल्या बी जीवाला काही खाऊपीऊ वाटलं तर हेच दोन पैसे कामाला येत्यात. कोणापुढे हात पसरावा लागत नाय.आतापर्यंत कष्टानं मिळल तसला भाकरी तुकडा सगळ्याना घातला.कोणाच्या दारात लेकरं उभी केली नायती. दोन पैसं बाजूला टाकत गेले .त्या पैशातून चार चांगली काम करता आली.मुलांची शिक्षण, पोटापाण्याची व्यवस्था झाली.आमचं म्हातारं दोन वर्षे झालं गेलं. त्यांची बी आभाळ होऊ दिली नाय.आता येतील तसं दिवस आनंदात ढकलायचं. आजीच्या शब्द अनेकजण कान देऊन ऐकत होते. जणू त्या जगण्याचा मंत्रच देत होत्या. तेथील संबंधित अधिकारी म्हणाले, आजी तुम्ही उदया या. तुमची शंका त्याच टेबलावरील क्लार्क निरसन करतील.ते आज नाहीत."
"हो बाबा म्हातारीला हेलपाटा". म्हणत आजी परत घरी जाण्यासाठी उठल्या.
"उदया येईन ओ साहेब. मला फक्त कुठं घोटाळा झालाय हे बघायचं हाय . खरंच व्याज कमी आलंय का ? या म्हातारीला काय कळतंय म्हणून नातवानं चार पैसे बाजूला काढून ठेवलेत. द्यायला हरकत नाय पण सांगून घ्यावं. आजीनं उभं आयुष्य काबाड कष्ट करून साठवलेला पैसा हाय. आता मी विचार केलाय पिकलं पान कधी पण गळल. कोणासाठी हे पैसे राखून ठेवायचे. हातपाय चालत्यात तोवर देवधर्म करीन. नवीन कापड धडूत लेईन, नेसीन किती वर्षे फाटक्यात गेली पण त्याची जाणीव आता कोणालाच नाही. कोण इचार करतंय त्याचा. सगळं सुख त्यांच्या पुढं आहे म्हटल्यावर . माझ्या हातानं दुसऱ्या एखादया म्हातारीला खाउपिऊ घालीन तेवढच पुण्य. मी जागेवर बसले तर माझी सेवा करणाऱ्याला राहिलेलं पैसं देईन. तोवर माझा पैसा कोणाच्या हाती लागू देणार नाय. आधीही कणखर होते आता बी तशीच हाय बघा. शरीर थकलंय पर मन ताजतवांन हाय. रेडिओवरचं समधं मी ऐकत असत्या. जिदगी एक बारच हाय आनंदाने जगुनी घ्या. रडत बसू नका.मनातलं दुःख सारखं ओकू नका असं सांगत असतंय त्यात. अन ते खरच हाय. दुःखावर डागण्या द्यायला अनेक जण जमा होत्याती लगेच.सावरायला काहीजणच येत्यात .त्यापेक्षा हसत रहावं. आयुष्य वाढतं आपलं".
चला निघते आता म्हणत आजी सावकाश पायऱ्या उतरू लागल्या. अनेकजण आजीच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होते. अगदी थोडया वेळेतही त्या बरंच काही जगण्याचं सार शिकवूनी गेल्या होत्या. जे अनेकांसाठी उपयोगी पडणार होतं. त्याचंही लाखमोलाचं आयुष्य कदाचित नव्या विचारांनं अन नव्यानंही घडणार होतं.

# गुन्हे कधीही लपत नाहीत



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**एका प्रसिद्ध वर्तमानपत्रातील मजकूर. तीस वर्षांनी सापडला गुन्ह्यातील आरोपी. या बातमीत आरोपीच्या नावासह उल्लेख होता. त्यानं एक हत्या केलेली होती व हत्येनंतर तो वेगवेगळी आपली नावं बदलवून वेगवेगळ्या शहरात वास्तव्याला होता. परंतू गुन्हा कधीही लपत नाही, या तत्वानुसार तब्बल तीस वर्षानं पोलिसांनी त्या आरोपीला पकडून ताब्यात घेतलं. होय, गुन्हा कधीही लपत नाही असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण प्रत्येक गुन्हे हे काही ना काही ठोस पुरावे मागे सोडत असतात. काळाच्या ओघात ते सापडतच असतात. गुन्ह्याचे काही प्रकार आहेत.**

१) गुन्हे करतांना काही लोकं राजरोषपणे करतात. अर्थातच ते जाणूनबुजून गुन्हे करीत असतात. कैदेतून सुटून येणारे बरेच कैदी हे या प्रकारात मोडतात. तसंच काही गुंड असेही असतात की ते हप्तावसूली करतात. काही लोकं जाणूनबुजून हत्याही करतात. हत्येच्या सुपाऱ्याही घेतात. त्यांना माहीत असते की असे गुन्हे केल्यास आम्हाला शिक्षा होईल. तरीही ते गुन्हेगार गुन्हे करीत असतात.

२) काही लोकं मजबुरीनं गुन्हे करतात. जसे. एखादा व्यक्ती जाणूनबुजून एखाद्या व्यक्तीवर तलवारीनं वा धारदार शस्त्रानं वार करीत असेल तर त्या व्यक्तीने बचावात्मक पवित्रा उचलून त्या जाणूनबुजून वार करणा-याला ठार करणे वा एखादा व्यक्ती एखाद्या स्त्रीवर जाणूनबुजून अत्याचार करीत असेल किंवा बलात्काराचा प्रयत्न करीत असेल तर त्याही ठिकाणी आपल्या बचावात्मक पावले उचलणे या गुन्ह्याला मजबुरीचे गुन्हेगार समजतात. ३) काही लोकांकडून गुन्हे अनवधानानं घडून येत असतात. जसे छतावर दोघेजण गोष्टीमध्ये रममाण झाले असतांना अचानक धक्का लागणे व जीव जाणे. शिक्षिकेची विद्यार्थ्यांना मारत असतांना अचानक छडी डोक्याला लागणे व तो दगावणे. रस्त्यानं चालता चालता गाडीचे ब्रेक खराब होणे. गुन्हे कसेही घडो. ते अनवधानाने घडो वा जाणूनबुजून, ते मजबुरीनं घडो वा इतर कोणत्याही कारणानं शिक्षेचं मापदंड सारखंच असतं. त्यामुळंच तसा गुन्हा घडल्यानंतर व्यक्ती घाबरतो. तो त्यानंतर आपल्या बचावाचे मार्ग शोधतो. त्यातच कधीकधी लेकरांचा गुन्हा असेल तर मायबाप स्वतःवर तो गुन्हा ओढवून घेतात व मुलांचा बचाव करतात. परंतु तरीही गुन्हे लपतात का? काळाच्या ओघात ते गुन्हे बाहेरच येत असतात व ते गुन्हे आपल्याकडून सत्य वदवून घेत असतात. महत्वपूर्ण गोष्ट ही की आपण मानव आहोत. आपण आपल्या हातून गुन्हा झाल्यास वा घडल्यास आपण लपवूनही टाकू. कारण आपल्याला माहीत असतं की आपण केलेला गुन्हा इतर माणसांनी पाहिलेला नाही. मग पुरावा कुठून मिळणार? आपण तर सुटणार आणि ते सुटतातही. कारण न्याय करणारे माणसंच असतात. त्यांना पुरावे हवे असतात. ते नसल्यानं वा न मिळाल्यानं आरोपी सुटणारच. कारण एखाद्या घटनेत पुरावे निर्माणही करता येतात आणि मिटवताही येतात. त्यानुसार न्यायदान होतं. अशा न्यायदानात लोकं बा इज्जत बरी होत असतात. कारण हे न्यायालय आपल्या घरचं असतं. आपण निर्माण केलेलं. परंतू याहीवरती एक न्यायालय असतं. ते विधात्याचं न्यायालय असतं. मग तो गुन्हा कोणताही असेना, तो विधाता ते सगळं पाहात असतो व त्या गुन्ह्यावर काही कालानंतर योग्य अशी शिक्षा प्रदान करीत असतो. ती शिक्षा महाभयंकर असते. अशारितीनं काही काळानंतर का होईना, गुन्हा बाहेर येत असतो महाभयंकर संकट येवून. याबाबत एक कथा सांगतो. कथा महाभारतातील आहे. या महाभारतात एकदा युद्धप्रसंगी भिष्म जात असतांना त्याला सैनिकांनी सांगीतलं की त्याच्या मार्गात एक साप आला आहे. काय करावे. त्यावर प्रतिक्रिया देतांना भिष्म म्हणाले की त्याला फेकून द्या. त्यानंतर त्या सैनिकांनी त्या सापाला दूर झाडीत फेकलं. त्यानंतर तो साप त्या झाडीत एका काट्याच्या झाडावर पडला. त्याला त्या झाडावरील असंख्य काटे रुतले. त्यातच तो साप विव्हळत मरण पावला. तो गुन्हा........तो गुन्हा भिष्माकडून झालेला. परंतू त्याची जाणीव भिष्मालाही नव्हती. परंतू गुन्हाच होता तो त्या भिष्माच्या प्रारब्धानं पाहिलेला. त्यानुसार भिष्म जेव्हा महाभारतातील युद्धात उतरले. तेव्हा त्यांच्या शरीरालाही अर्जुनाचे असंख्य काटेरुपी बाण लागले व घडलेल्या गुन्ह्याची शिक्षा मिळाली.



गुन्हे लपत नाहीत. ते बाहेर निघतातच. अगदी संकट येतात मोठमोठे. निसर्ग संकट आणत असते आपली त्या पापातून सोडवणूक करण्यासाठी. तसं पाहता या सृष्टीतील प्रत्येकच व्यक्ती गुन्हेगार आहे. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण या सृष्टीला देण निसर्गाची आहे. या निसर्गानंच सृष्टीच्या ओंजळीत भरभरुन टाकलंय. या सृष्टीतील प्रत्येक जीव हा निसर्गाची देण आहे. मग त्यात झाडंही आलीत. परंतू आपण काय करतो? काहीच नाही. मग गुन्हेगार कसे? आपण कोंबडे, बकरे खातो, गाय खातो, मासोळी, ऊंट, रेडे, मेंढे आणि तत्सम तितरा बितरासारखे असंख्य प्राणी खातो. कोणी मुंग्या माकोडेही खातात. त्यातच कोणी कोणी फळभाज्याही खातात. कोणी झाडंही तोडतात. कोणी पृथ्वीचे पोट फाडून कोळसा काढतात. हे पापच. आपल्या हातून घडत असलेलं. या सृष्टीतील प्रत्येकच जीव हा निसर्गाचा लेकरुच असतो. फळं. झाडांची लेकरं असतात आणि झाडं निसर्गाची लेकरं असतात. परंतू आपण आपल्या जिभेचे चोचले म्हणून ते खातो अन्न म्हणून. झाडांना तोडतो, बांधकाम करण्यासाठी. कारण आपल्यासमोर त्याला खाण्याशिवाय व तोडण्याशिवाय पर्यायच नसतं. परंतू ते पाप घडतं आपल्या हातून घडतं. घोर पाप. हे घडणारं पाप कोणीच पाहात नाही. कोणी बोलूही शकत नाही. समजा एखाद्या कोंबड्या बकऱ्याला मारलं तरी तो बोलणार नाही वा तो रागावणार नाही वा त्याबद्दल कोणी बोलूही शकणार नाही. कारण तो मुका जीव किंवा ही झाडांची गोड मधूर फळं खाल्ली तर कोणी बोलणार नाही. परंतू तो विधाता ते सगळं आपल्या हातून घडणारं पाप पाहात असतो व तो काही काळानंतर या पापावर पांघरुण घालत नाही तर फार मोठी शिक्षा देत असतो आपल्याला. ती शिक्षा त्सुनामी, अवर्षण, भुस्खलन, भुंकंप, दुष्काळ ओला व कोरडा. अर्थातच पाऊस न येणे ही देखील निसर्ग आपल्याला देत असलेली शिक्षाच आहे. महत्वाचं म्हणजे आपल्ता हातून अनवधानानं घडून येणारे गुन्हे सोडा, परंतू जे गुन्हे आपण जाणूनबुजून करतो. ते गुन्हे शक्यतोवर आपण टाळावेत. झाडं तोडू नयेत. फळं खावू नयेत. मुके प्राणी तर कधी मारुनच खावू नये. भाजी खायची असेल तर डाळीचं वरण किंवा डाळीचे पदार्थ खावेत. तशीच जाणूनबुजून कोणाची हत्या करु नये. मग ते प्राणीच नाही तर माणसंही का असेना. कारण गुन्हे लपत नाहीत. ते उघडकीस येतात. कधी त्सुनामी रुपानं तर कधी अपघात, पूर, अवर्षण, भुस्खलन आणि भुकंप या रुपानं. अर्थातच सृष्टी आपल्याला आपल्या पापाची शिक्षा देत असते हे तेवढंच खरं आहे.

# ज्येष्ठ अभिनेत्री शांता तांबे काळाच्या पडद्याआड !

आधुनिक केसरी

मराठमोळ्या घरंदाज व ग्रामीण बाज असलेल्या अभिनयाने मराठी चित्रपट सृष्टीत ठसा उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री शांता माधव तांबे यांचे निधन झाले कधी खाष्ट ग्रामीण स्त्री, पाटलीण तर कधी घरंदाज स्त्री, मायाळू आई, सासू अशा अनेक भूमिका त्यांनी निभावल्या. सहजसुंदर अभिनय आणि साधेपणामुळे त्या प्रेक्षकांना आपल्यातल्याच एक वाटायच्या. शांत, मायाळू स्वभावाच्या शांता तांबे या स्वतःला भूमिकेत झोकून द्यायच्या. त्यांची दिवंगत अभिनेते भालचंद्र कुलकर्णी यांच्यासोबतची चहाची जाहिरात व प्रेमा तुझा रंग कसा या नाटकातील भूमिका गाजली होती.शांता तांबे या मूळच्या सोलापूर जिल्ह्यातील बार्शीच्या. वडिलांच्या हॉटेलात नाटक मंडळीतील लोक येत असल्याने त्यांना या क्षेत्राची माहिती होती. त्या १५ वर्षांच्या असताना वडील वारले, मामाशीच त्यांचा विवाह झाला.चरितार्थासाठी हे कुटुंब कोल्हापूरला आले.

सुरुवातीला देशबंधू संगीत मंडळीत तसेच वेगवेगळ्या नाटकांमध्ये मॉबमध्ये काम केले. पुढे मराठी चित्रपटात लहानमोठ्या भूमिका करत त्यांनी आपला ठसा उमटवला. मानिनी चित्रपटातील भूमिकेने त्यांना ओळख दिली.त्यांनी भालजी पेंढारकर, दिनकर पाटील, अनंत माने यांच्या दिग्दर्शनाखाली काम केले. मोहित्यांची मंजुळा, सवाल माझा ऐका, सुगंधी कट्टा, आई पाहिजे, असला नवरा नको गं बाई, सोंगाड्या, चांडाळ चौकडी, दोन बायका फजिती ऐका, मुंबईचा फौजदार, प्रतिकार, निर्मला मच्छिंद्र कांबळे, एक गाव बारा भानगडी, मर्दानी, आई पाहिजे हे त्यांचे गाजलेले चित्रपट होते.अलीकडे 'तुझ्यात जीव गुंतला' या मराठी मालिकेतही त्यांनी भूमिका केली होती. 'सवाल माझा ऐका' या चित्रपटातील भूमिकेसाठी त्यांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. काही काळ त्यांनी पती माधव यांच्यासोबत मंगल कलामंदिर ही नाट्य संस्थादेखील चालवली.अशा ग्रामीण ढंगाचा बाज असणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्रीच्या निधनाने त्यांच्या चाहत्यांसह संपूर्ण मनोरंजनसृष्टी पोरकी झाली आहे त्यांना विनम्र आदरांजली....! ध्याच्या चित्रपटांबाबत शांता तांबे म्हणाल्या होत्या की, आताचे सर्व चित्रपट कॉमिक आहेत. ते चित्रपट सर्व चांगले आहे. त्याकाळातील कथानक वेगळे आताचे वेगळे आहेत. दिग्दर्शकही वेगळे असतात. त्यांचे काम देखील वेगळे असते. आम्हाला त्या काळी चांगले दिग्दर्शक मिळेल. त्यामुळे मला अभिनय देखील चांगला करता आला, असे प्रतिपादन शांता तांबे यांनी एका मुलाखतीत केले.

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव



# अरे,पावसा तू लपलास तरी कुठे ?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**मृगही कोरडा गेला अन् दुसरा नक्षत्र लागण्याची वेळ आली तरी अजून तुझा पत्ता दिसत नाही नेमकं तू गेलास तरी कुठे..? आज मी बळीराजा तुला विचारत आहे. जेव्हा तुझी गरज नसते तेव्हा तू आपल्या मनाने सतधार पडत असतोस अन् आज तुझी गरज आहे तर..तू लपलास..?**

हा हंगामाचा सिझन आहे आज जर.. मी शेतात पेरणी केली नाही तर.. खाणार तरी काय. . ? दिवसेंदिवस तुझ्या ह्या खेळामुळे मी कंटाळून गेलो आहे. वरतून माझ्या डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे .सोबतच बऱ्याच अडचणी माझ्या जीवनात आहेत हेच तुला मी वारंवार सांगत बसू का. . ? की,अजून कोणाला सांगत फिरू ही वेळ हंगामाची आहे दरवर्षी या दिवसात मी माझ्या शेतात पेरणी करत होतो, धुरे पालवत होतो पण,या वर्षी तुझा पत्ताच दिसत नसल्यामुळे मी कर्मचारी असल्यासारखं घरी बसून आहे जर.असाच बसत राहिलो तर..मला कोणी महिना भरला तर.. पगार देणार आहे का. ..? अरे,माझे जगणेच जगापेक्षा वेगळे आहे मी द्यायलाच शिकलो घ्यायला नाही म्हणून कदाचित तू सुध्दा माझी परीक्षा घेत असशील नाही का..? घे,बाबा घे,माझी परीक्षा अरे,सारेच माझी परीक्षा घेत आहेत पण, मी मात्र प्रत्येक परीक्षा दररोज देत असतो तेही न घाबरता पण आज काय करू निदान तू तरी कोपू नकोस रे आज तुझ्या न येण्याने मला चिंता सतावत आहे कारण इतरांच्या घरी बायको, मुले आहेत तसेच माझ्या घरी आई,बाबा,बायको, मुले एवढा कुटूंब आहे आणि त्यांचे पालणपोषण करण्यासाठी मला शेती केल्याशिवाय कोणताच पर्याय नाही.

जर आज मी हार मानून मेलो तर माझ्या कुटुंबाला पोसणारा कोणीच नाही रे, ही बळीराजाची आर्त हाक आहे ती ऐकून घे, काय करू मी आणि काय नाही आज असचं वाटत आहे शेतावर जाण्याची इच्छा होत नाही एवढी कडक उन्ह आज पडत आहे हे तुला दिसत नाही. तू कुठे पडतोस ,कुठे पडत नाही मला वाटते इतरांन सारखं माझ्यासोबत भेदभाव करतेस की,काय असंच वाटत आहे. म्हणून कुठेतरी आज असं वाटते की तू आणि शासनाने एकमत केले असावे म्हणूनच तर.. तू लपलेला आहेस पण,पावसा एवढेही लपू नको रे,मी तुझं तर..काय कोणाचचं वाईट केलं नाही म्हणून मला जगाचा पोशिंदा म्हणतात माहीत आहे ना तुला. ..? पण,फक्त पदवी पुरता मी मर्यादित राहिलो आहे व जय जवान जय किसान नारे देण्यासाठीच मी महान झालो आहे बाकी तुझ्या सारखेच दिखावूपणा करणारे, दाखवणारे व माझ्याकडे पाठ फिरवणारे टपून बसलेले आहेत म्हणून माझा विकास होत नाही. म्हणून माझे कितीतरी मित्र गळफास घेऊन आत्महत्या केली आहे करत आहे व कोणी पोटासाठी वणवण भटकत फिरत आहे मात्र त्याकडे लक्ष दिल्या जात नाही त्यामुळे बळीराजाची भयानक परिस्थिती आज निर्माण झालेली दिसत आहे. म्हणून तू तरी असा करू नकोस,रे डोळे वटारून बसू नकोस एकदा तरी येरे पावसा अन् माझ्या शेतात पेरणी करू दे,सकाळी उठतो अन् आभाळाकडे बघतो तर नुसती कडक उन्ह पडत असते तेही एकसारखी संध्याकाळ होई पर्यत अशाने कसं होईल रे,माझं एवढा माझा अंत बघू नकोस येरे पावसा ये, माझ्या डोळ्यातून अश्रू वाहत आहेत बघं तरी तुला चांगल्या प्रकारे दिसतच आहेत आज माझ्या जीवनात एवढे संकट, प्रसंग तसेच विजेचा वाढता बील, माझ्या मालाला पाहिजे तेवढा भाव मिळत नाही मग तूच तरी सांग एवढ्या गोष्टी माझ्या सोबत घडत असतात तेव्हा का बरं मला न्याय मिळवून देण्यासाठी कोणी पुढाकार घेत नाही. माझ्यासाठी आंदोलन करत नाही म्हणजे तुझ्या सारखेच ते सुद्धा स्वार्थी झाले म्हणावे लागेल. आज तुझा पत्ता दिसत नाही पण,मला असं कोणी विचारत नाही की, अरे भाऊ तू कसा आहेस बघं पावसा आज ही परिस्थिती निर्माण झालेली आहे .उद्या तर..मला कोणी ओळखायला सुद्धा तयार होणार नाही मग मी कोणाकडे न्याय मागायला जाऊ. . ? पावसा असं नको करू आता तरी ये मलाही जगायचं आहे आणि या जगाला सुध्दा जगवायचं आहे भलाही त्यांनी माझा विचार नाही केला तरी चालेल पण,मी मात्र सर्वांचा विचार करत असतो.

# बिरबल सापडला

आधुनिक केसरी

एकदा, एका गोष्टीवर अकबर आणि बिरबलची चर्चा चालू होती व क्षुल्लक कारणावरून त्यांच्यात वाद झाला. अकबरने बिरबलला दरबारात येण्यास बंदी घातली व राज्याच्या बाहेर जाण्याचा आदेश दिला. बिरबल राज्य सोडून एका गावात गेला. परंतु, काही दिवसांतच अकबरला दरबारात बिरबलची अनुपस्थिती जाणवू लागली. वेळोवेळी अकबर बिरबलची आठवण काढत असे व चिंता करत असे. परंतु, बिरबलचा ठावठिकाणा नसल्यामुळे त्याला शोधणे अवघड होते. अकबरने बिरबलला परत आणण्यासाठी एक युक्ती बनवली. त्याने पूर्ण राज्यात दवंडी पिटविली की, 'जो माणूस सावलीतही उभा नसणार व उन्हातही नसणार म्हणजेच जो व्यक्ती अर्धे ऊन व अर्ध्या सावलीत चालेल व जो अत्यंत उपाशी असेल अशा व्यक्तीला खूप मोठ्या रकमेचे बक्षिस दिले जाईल.'

हया दवंडीची घोषणा राज्यातील प्रत्येक गावात आणि प्रत्येक गल्लीत केली गेली. ही गोष्ट बिरबलपर्यंत पोहोचली. त्याने तो राहत असलेल्या गावातील एका गरीब व्यक्तीला आपल्या जवळ बोलवून राजदरबारात जाण्यास सांगितले. तसेच राजाच्या प्रश्नांना कशी उत्तरे दयावी तेही सांगितले. बिरबलने एक मोठी खाट त्या माणसाला दिली व बोलला, 'ही खाट तू तुझ्या डोक्यावर ठेव आणि राजवाडयात जा. जाताना चुरमुरे खात खात जा. माझ्या सूचनेप्रमाणे राजाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तरे दे.' बिरबलने सांगितल्याप्रमाणे त्या माणसाने खाट आपल्या डोक्यावर ठेवली व राजवाडयाकडे जाण्यास निघाला. दरम्यानच्या काळात तो शेंगदाणे व चुरमुरे खात चालला होता. अशा मजेदार माणसाला बघून शिपायाने त्याला थांबवले. जेव्हा तो म्हणाला महाराजांनी घोषणा केल्याप्रमाणे मी माझे बक्षिस घेण्यासाठी आलेलो आहे. त्यानंतर त्याला दरबारात सोडण्यात आले. तो राजदरबारात त्याच पध्दतीने गेला. त्या मजेदार माणसाला बघून अकबर बोलला, 'कोण आहेस तू?' 'मी एक माणूस आहे.' तो बोलला. 'अच्छा! मग तू असा डोक्यावर खाट ठेऊन का आला आहेस?' अकबरने विचारले. तो बोलला, 'महाराज! ही तुमचीच घोषणा आहे, की तुम्ही अशा व्यक्तीला बक्षिस देणार आहात जो सावलीतही नाही व उन्हातही नाही. त्यामुळे मी ही खाट माझ्या डोक्यावर ठेवली आहे. मी सावलीतही नाही व थेट सुर्यप्रकाशातही नाही.' त्यानंतर त्याने त्याच्या तोंडात चुरमुरे कोंबले. अकबर बोलला 'हे काय आहे? तू राजदरबारात का खात आहे?' तो म्हणाला, 'महाराज! ही कृती तुमच्याच घोषणेचा एक भाग आहे. मी खात आहे तरी माझी भूक पूर्णपणे संपलेली नाही कारण मी खूप भूकेलेला आहे.' हे सर्व ऐकून अकबर कुतुहलाने बोलला, 'सांग मला, तुला हे सर्व कोणी शिकविले?' 'महाराज! काही महिन्यांपासून आमच्या गावात एक अनोळखी विव्दान व्यक्ती रहात आहे. त्याच्या सांगण्यावरूनच मी हे कार्य केले आहे.' तो गावकरी माणूस भोळेपणाने बोलला.



अकबरला लगेच समजले की तो अनोळखी व्यक्ती कोण आहे ते. तो आनंदाने ओरडला, 'मला बिरबल सापडला!' त्यानंतर त्याने त्या माणसाला योग्य ते बक्षिस दिले. त्याने आपले काही दूत त्या गावात पाठविले व राजसन्मानाने बिरबलला परत आणले.

# शेतकऱ्यांना 'प्रधानमंत्री किसान'ची प्रतीक्षा !

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** प्रधानमंत्री किसान योजनेचे दोन हजार रुपये दर चार महिन्यांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत होते. त्यामुळे खरीप हंगामामध्ये दोन हजार रुपये मिळतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी होती. मात्र, अजूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर चौदाव्या हप्त्याचे पैसे जमा झालेले नाहीत. म्हणून शेतकरी 'प्रधानमंत्री किसान'चा हप्ता कधी जमा होणार याची प्रतीक्षा करीत आहेत. केंद्र सरकारकडून दर चार महिन्याला दोन हजार हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात.

यामध्ये कधीही खंड पडला नव्हता. पीएम किसान योजनेचा चौदावा हप्ता ३० मे रोजी जमा होणार होता. त्यामुळे शेतकरी रोज बँकेत हप्ता जमा झाला का, याची चौकशी करतात. परंतु, आज १९ जून उजडला तरीही पीएम किसानचा हप्ता जमा झालेला नाही. याबद्दल शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या खरीप हंगामातील पेरणीपूर्व मशागत आणि बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज आहे. या आठवड्यात मॉन्सूनने हजेरी लावल्यानंतर पेरणीसाठी लगबग सुरू होणार आहे. परंतु, सध्या पीएम किसानचा हप्ता नाही आणि नमो शेतकरी महासन्मानचीही मदत मिळाली नसल्याने शेतकरी नाराज आहेत. राज्य शासनाने पीएम किसान योजनेच्या नियमानुसारच नमो शेतकरी महासन्मान योजनेतून प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यावर सहा हजार रुपये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, ती रक्कम लवकर मिळाल्यास खरीप पेरणी, बियाणे खरेदीसाठी उपयोगात येईल अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

**प्रशासन म्हणते, आधार लिंक नाही !**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या चौदाव्या हप्त्याबद्दल शेतकरी प्रशासनाकडे चौकशी करत आहेत . यावेळी प्रशासनाकडून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी ई–केवायशी केलेली नाही . यामुळे पीएम किसान सन्मान योजनेचा निधी वर्ग होण्यास अडथळे निर्माण झाल्याची जुजबी उत्तरे प्रशासनाकडून दिली जात आहेत .

**नमो शेतकरी महासन्मानची रक्कम मिळणार**

नमो शेतकरी महासन्मान निधी केंद्राच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेसाठी योजना आहे . यानुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर महाराष्ट्र सरकार वर्षाला सहा हजार रुपये जमा करणार होते . ३० मे रोजी शासनाने तसा निर्णय घेतला होता . दोन दिवसांपूर्वी शासनाने नमो शेतकरी महासन्मान योजनेचा आदेश काढला आहे . यामुळे सरकारकडून योजनेची घोषणा होते . परंतु अंमलबजावणीच व्यवस्थित होत नसल्याबद्दल शेतकऱ्यांतून नाराजीचा सूर आहे .

# रमाई, पंतप्रधान आवास योजना अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती द्या

## रेती न मिळाल्यास जनआंदोलन करणार : नगराध्यक्ष पूनम पाटोळे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** नगरपालिकेच्या वतीने तहसीलदार यांना दिनांक २१ जून रोजी सकाळी ११ वाजता नायब तहसीलदार परळीकर मॅडम यांना निवेदन दिले. या निवेदनात रमाई आवास योजना नगर परिषद लोणार अंतर्गत दि.२६/०५/२०२३ रोजी रमाई आवास योजने अंतर्गत व पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. सदर लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी रेतीची आश्यकता आहे. परंतू अद्याप पर्यंत रेती वाहतुकीस मंजूरी न दिल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना घरकुलाचे बांधकाम करता येत नाही.
सदर लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाल्यामुळे, त्यांनी त्यांचे कच्चे घराचे बांधकाम तोडले आहे. त्यामुळे अशा लाभार्थ्यांना व त्यांच्या कुटुंबाना उघड्यावर रहावे लागत आहे. तरी अशा लाभार्थ्यांचे घरकुल येणाऱ्या पावसाळ्याच्या आगोदर लवकरात लवकर पुर्ण व्हावे यासाठी आपल्या स्तरावरून शासन आदेशानुसार जप्त केलेली रेतीच्या साठ्या मधून अशा लाभार्थ्यांना रेतीचा पुरवठा करण्यात यावा. सदर घरकुल लाभार्थ्यांना रेती न मिळाल्यास लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येईल व होणाऱ्या नुकसाणीस शासन जबाबदार राहील असे निवेदन दिले. यावेळी नगराध्यक्ष पूनम पाटोळे, उपनगराध्यक्ष बादशाह खान, तालुकाध्यक्ष राजेश मापारी, पाणीपुरवठा सभापती सौ जोशना सरदार, ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात, काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद, गुलाब सरदार, ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे, माजी नगरसेवक हाजी गफार कुरेशी, मनीष पाटोळे, अनिल पाटोळे, यावेळी लाभार्थी पुंडलिक भगत, सीमा अंभोरे, बालक भगत, बाबाराव कळासरे, अर्जुन इंगोले, नारायण चाटे, शितल अशोक, प्रल्हाद इंगोले, शांताबाई खिल्लारे, विमल तुर्कमाने, परसराम खिल्लारे, शेषराव पन्हाळ, रमेश गवई, कैलास गवई, लक्ष्मण पसरटे उपस्थित होते.



महाराष्ट्र शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे आज जनता त्रस्त झाली आहे घरकुल बांधण्यासाठी शासनाने केलेल्या धोरणामुळे घरकुल लाभार्थी रेती पासून वंचित आहे यामुळे गोरगरिबांना घर बांधणे अवघड झाले आहे . अवैधरीत्या रेती जवळपास १० हजार रुपये ब्रास मिळते . परंतु गरिबांना लाभार्थ्यांना घरकुलसाठी रेतीची आवशयकता आहे त्यांच्यासाठी कोणती व्यवस्था नाही . आमची शासनाला मागणी केली .शासनाने त्वरित रेती उपलब्ध करून द्यावी . अन्यथा लोकशाही मार्गाने जन आंदोलन करू .
**राजेश मापारी, तालुका अध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**

प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत गरिबांना पक्की घरे याच योजनेतून देण्यात येतात एकूण १७ घरांना बांधकाम परवानगी देऊन नगरपरिषद लोणार यांनी पक्की घरे पाडण्यास सांगितली परंतु रितसर पद्धतीने मिळणारी वाळू लिलावाच्या विलंबाने बंद आहे त्यातच अवैध वाळू १० हजार रुपये ब्रासने मिळत आहे . योजनेचा लाभ आणि खर्च परवडत नसल्याने लाभधारक हे रस्त्यावर आलेत तहसीलदारांना वेळोवेळी विनंती करूनही त्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे त्यामुळे स्वप्नातील घरांवर छताएवजी पावसाचेच पाणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून प्रशासनाने त्वरित रेती उपलब्ध करून द्यावी .
**गजानन जाधव, शहरप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे**

अवैध वाळूला पाबंद घालण्यासाठी माननीय तहसीलदार जोशी साहेबांनी तात्काळ कारवाई करावी कुठल्याही राजकीय दबावापोटी अवेध वाळुची वाहतूक करण्यासाठी हायवा ट्रॅक्टर चालता कामा नये याची नोंद घ्यावी . **इब्राहिम शेख, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश**

वाळूच्या माध्यमातून राज्य सरकारला लाखो रुपयाचा महसूल प्राप्त होत असतो परंतु वाळू माफियांच्या दबावापोटी लोणार शहरासह तालुक्यात अवैध वाळूचा व्यवसाय होत आहे याकडे तहसीलदारांनी लक्ष द्यावे . **शेख समद शेख अहमद, शहराध्यक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस**

शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे घरकुलाचे रेती अभावामुळे काम रखडले अनेक घरकुलाचे काम अर्धवट अवस्थेत आहे . जुन महिना संपत आलेला आहे त्यामुळे सर्व सामान्याचे हाल होतील त्यांना सक्त रेतीची गरज आहे तसेच बांधकाम मजुराची उपासमार होत आहे शासनाने त्वरित घरकुल धारकांसाठी रेती उपलब्ध करून द्यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल .
**संतोष मापारी, नगरसेवक न .प .लोणार**

# नाल विक्रीसाठी अशीही 'अश्व' सवारी.. घोड्यांच्या वेदना पोलिसांच्या दारी!

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**जळगाव :** काळ्या घोडयाची नाल ही शुभ मानली जाते, या नालीच्या विक्रीसाठी काळ्या रगाच्या घोड्यांना असह्य वेदना पोहचविणाऱ्या व्यवसायिकांना वन्यजीव संरक्षण संस्थाने कायद्याच्या कचाट्यात अडकविले आहे तीनही व्यावसायिकाला नशिराबाद पोलिस स्टेशनला आणले गोरखधंदा करण्यासाठी खुंराची सातत्याने चाळणी होत असल्याने तीनही घोडयाना दिवसभर वैदना सहन कराव्या लागत असत्याचा संत्तापजनक प्रकार सुरू असताना वन्यजीव संरक्षण संस्थाने त्याची दखल घेतली तीन काळ्या रंगाचे घोडे गेल्या तीन दिवसांपासून तरसोद फाटा भागात दिसून येत आहेत या घोडयासोबत असलेले तीनही घोडयाची नाल विक्री करण्यासाठी रोडवर ठाण मांडून बसतात यांची माहिती कळताच वन्यजीव संरक्षण संस्थांचे बाळकृष्ण देवरे सर यांनी या तीघाचा शोध सुरू केला काळ्या घोडयाची नाल अंधश्रदाळु नागरीकांच्या दृष्टीने महत्वाची मानली जाते, म्हणूनच या नालसाठी तीनशे ते पाचशे रूपये अनेकांनी मोजल्याचे स्पष्ट झाले आहे नाल विक्री झाली की हा व्यवसायिक घोड्याचा पायाला दुसरी नाल ठोकतो आणि ग्राहक आल्यावर पुन्हा काढतो त्यामुळे घोड्याचा खुरांना अनेक छिद्रे पडून जखमा होत आहे त्यामुळे त्यांचा पाय लंगडतो आहे. वन्यजीव संरक्षण संस्थेची सचिव योगेश गालफाडे , रवीद्र फालक, बाळकृष्ण देवरे, जगदीश बैराणी, मयूर वाघुळदे यानी या व्यवसायिकांचा तरसोद फाटा येथे शोध सुरु केला तरसोद फाटा येथे घोडयासह उभे असलेल्या तीनही व्यवसायिकांना ताब्यात घेतले आणि त्यांना नशिराबाद पोलिस ठाण्यात आणले तिघेहीं व्यावसायिक परप्रांतीय आहेत, दरम्थान, ताब्यात घेतलेल्या तीनही व्यवसायिकावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. नशिराबाद पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

**असे आहेत गैससमज :** घराच्या मुख्य दारावर काळया घोडयाची नाल लावल्याने घरावर कोणाची वाईट नजर लागत नाही आणि बरकत कायम राहते, असा अनेकाचा गैरसमज आहे . ज्योतिष जाणकारांच्या माहितीनुसार काळ्या घोडाच्या पायावर शनिचा विशेष प्रभाव असतो नाल लोखंडापासुन बनवलेली असते लोह शनिचा धातु आहे आणि शनिचा काळा रंग आहे, आवडता रंग आहे घोड्याची नाल असल्याने शनिचा प्रकोप संपुष्टात येतो, असा अनेकाचा समज आहे,



# गुरुदेव संगीत विद्यालयात जागतिक संगीत दिन साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** जगभरामध्ये २१ जून हा दिवस जागतिक योग दिन आणि जागतिक संगीत दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संगीत आचार्य रत्न ( तबला ) भगवान राईतकर हे होते. तर, रूपाली राजेश तुपकर व योगशिक्षिका गीता भगवान राईतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रत्येकाच्या जीवनामध्ये योगाचे आणि संगीताचे महत्त्व खूप आहे. शारीरिक आणि मानसिक व्याधी कमी करण्यासाठी संगीत आणि योगा या दोन्हीचाही उपयोग होतो. यावेळी रूपाली राजेश तुपकर आणि गीता भगवान राईतकर यांनी संगीत दिनाच्या निमित्ताने संगीत आणि योगा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये भगवान राईतकर यांनी जीवनामधील संगीत विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर विशद केले.
स्थानिक चनखोरे कॉलनीतील श्री गुरुदेव संगीत विद्यालयात जागतिक संगीत दिनानिमित्त गायन आणि वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी श्री गुरुदेव संगीत विद्यालयाचे विद्यार्थीनी गायन आणि वादनाचे सादरीकरण केले. यामध्ये निरीक्षक जोशी या विद्यार्थ्यीनीने ' लकडी की काठी ' हे गाणं कराओके वर सादर केले. प्रीती जोशी या विद्यार्थिनीने ' ताल से ताल ' हे गाणे कराओकेवर सादर केले. यजुर्व राईतकर यानी ' तेरी मेरी..' हे कराओके साँग गायन केले.

यावेळी निनाद खोडके, कैवल्य चाकोते, यजुर्व राईतकर, साईशा जोशी, शुभांगी लोढे, निरिक्षा जोशी, अथर्व राईतकर, साई तुपकर, प्रीती जोशी, रतिका उबाळे इत्यादी संगीत साधक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री गुरुदेव संगीत विद्यालयाची विद्यार्थ्यांनी शुभांगी लोढे हिने मानलेत.

# स्वतंत्र आदिवासी कायदा व्हावा; एकलव्य संघटनेची पत्रकार परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यात आदिवासी बजेट कायदा राबवणे व धुळे लोकसभा धुळे ग्रामीण व शिंदखेडा विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या निवडणुकीत उमेदवारी करण्यासाठी आदिवासीं पुढाकार घेणार आहे, असे आवाहनही एकलव्य संघटना यांनी पत्रकार परिषदेत करण्यात आले. आदिवासी निधीचा योग्य उपयोग व्हावा यासाठी आदिवासी कायदा येणे योग्य आहे. येणाऱ्या निवडणुकीत आपली ताकद दाखवून निवडणूक लढावी असे आवाहनही करण्यात आले. आदिवासी समाजात काही गोष्टीचे ज्ञान कमी असल्यामुळे मुली व मुलांचे कमी वयात लग्न लावतात या गोष्टीसाठी आदिवासी विकास कायदा होणे खूप गरजेचे आहे एखाद्या विभागात आदिवासीने कुठल्या योजने संदर्भात निविदा दिली तर त्या ठिकाणी खूप अडचणी येतात व शेवटी कित्येक आदिवासीना लाभ मिळत नाही. एकलव्य संघटना आदिवासी समाज सन 2014 पासून शिवसेनेला मदत करत होती परंतु यावेळेस आम्ही त्यांच्याकडे स्वतंत्र तिकिटाची मागणी केली आहे असे या पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.



# अभंग, भारुडातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

## वंचित घटकांनी बार्टीच्या योजनांचा लाभ घ्यावा : डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा तरडगाव, ता.फलटण येथे मुक्कामी आल्यानंतर बार्टीची संविधान दिंडी सुद्धा दाखल झाली.या संविधान दिंडीतून संविधान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रम संपन्न होत असताना पालखी सोहळ्यात आलेल्या वासुदेव आणि वारकऱ्याकडून संविधान दिंडीच्या कार्यक्रमात सहभागी होत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभंग आणि भारुडातून अभिवादन करण्यात आले. ज्ञानोबा गजे ( वासुदेव ) बीड, मधुकर रणधिर ( वारकरी ) नांदेड या वारकऱ्यांनी भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बदल अभंगातून व भारूडातून गीत सादर केले. या गीताबद्दल बार्टीकडून भारतीय संविधान देऊन वारकऱ्यांचे विशेष आभार मानले गेले. या संविधान दिंडीतून बार्टीचे विभाग प्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.अनुसुचित जातीच्या घटकांतील बांधवांनी बार्टीच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेऊन आपल्या मुलांना प्रशिक्षण देऊन प्रशासनात पाठवावे असे प्रतिपादन बार्टीचे विभागप्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे या संस्थेच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आले असून या दिंडीतून संविधान जनजागृती केली जात आहे. तरडगाव येथील पालखी मार्गावर जागर संविधानाचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.चव्हाण हे बोलत होते. बार्टी संस्थेच्या विस्तार व सेवा विभागाच्या वतीने समतादुत हे भारतीय संविधान तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य महामानव, संतांच्या समतेचा विचारांचा प्रचार व प्रसार संपुर्ण महाराष्ट्रात



करत असून संविधान दिंडीतील त्यांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले. डॉ.चव्हाण यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांचा भारतीय संविधानाची प्रत व उद्देशिका भेट देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात गजलकार अशोक गायकवाड यांनी भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित गजल सादर करून वारकरी बांधवांमध्ये भारतीय संविधाना बाबत प्रचार व प्रसार केला. संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिकपणे वाचन करण्यात आले. यावेळी बार्टीचे विभागप्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या सह कार्यालय अधिक्षक रितेश गोंडाणे, सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक विकास गायकवाड, प्रकल्प अधिकारी दिलीप वसावे, युनुस तडवी, रामदास लोखंडे, सातारा जिल्ह्यातील सर्व समतादुत, विविध क्षेत्रातील मान्यवर, वारकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास गायकवाड यांनी केले. सुत्रसंचलन समतादुत विशाल कांबळे यांनी केले. तसेच आभार दिलीप वसावे यांनी मानले.

# ऋषी महाराज विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** बदनापूर तालुक्यातील व राजूर पासून जवळ असलेल्या आसरखेडा येथील ऋषी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दहावी, बारावी आणि नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना करियर संदर्भात मार्गदर्शनही करण्यात आले.
सर्वप्रथम राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी संस्था अध्यक्ष सुभाष बोडके, उपाध्यक्ष सारंगधर बोडखे, सामाजिक कार्यकर्ते प्रा. बाळासाहेब बोराडे, पत्रकार फिरोज शेख, प्राचार्य अमोल बोडखे, कृष्णा जाधव, सरपंच, उपसरपंच, शालेय समितीचे अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी, बारावी आणि नीट परीक्षेचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून या परीक्षेत ऋषी महाराज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यसह गुण मिळवून याही वर्षी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. दहावीच्या परीक्षेत संचिता हिवाळे प्रथम,पवन बोडके द्वितीय तर समीक्षा बोडखे हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. इतर विद्यार्थ्यांनीही ८०% टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून यश संपादन केले आहे. तर बारावीच्या परीक्षेत निकिता डोके प्रथम, दीपक बोडके द्वितीय तर ज्ञानेश्वर हिवाळे याने तृतीय क्रमांक पटकावून विशेष प्राविण्यास गुण संपादन केले. यामध्ये सुरेश बनसोडे, धनराज बोडखे, निवृत्ती काकडे या विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे. सुरेश बनसोडे या विद्यार्थ्यांने अतिशय प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत नीटमध्ये यश मिळवल्याने त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.बोराडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात दहावी बारावीनंतर पुढे काय या विषयावर मार्गदर्शन केले.तर विद्यार्थ्यांनी अपयश आल्यानंतर खचून न जाता सातत्याने प्रयत्न करत राहावे म्हणजे यश हमखास मिळते असे संस्थेचे अध्यक्ष सुभाष बोडखे यांनी म्हटले. कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक नारायण बोडके, यादव डोके, एकनाथ हिवाळे, उत्तम हिवाळे, माधव बोडखे, कैलास हिवाळे, गणेश बोडके, ज्ञानेश्वर हिवाळे,कैलास हिवाळे तसेच माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य एन. के.काटकर, शिक्षक एल.एस. राजहंस,जी. एल. झिने, व्ही. एस. राऊत यांनी परिश्रम घेतले.

# बिबट्याच्या हल्ल्यात गोऱ्ह्याचा मृत्यू

## भोकर तालुक्यातील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** उन्हाच्या तीव्रतेने जनतेला हैराण करून सोडले आहे. वन्यजीवही तहान भागविण्यासाठी मानवी वसाहतीकडे मोर्चा वळविल्याचे दिसून येत आहे. गूरूवारी ( ता.२२ ) पहाटेच्या सुमारास धावरी ( ता.भोकर ) येथील एका आखाड्यावरील गोऱ्ह्याचा फडशा पाडल्याची घटना घडल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत.



उन्हाळा संपून पावसाळा सूरू झाला तरी पाऊस सरी बरसायला तयार नाहीत. खरीप पेरण्या रखडल्याने शेतकऱ्यासह जनता पावसाच्या प्रतीक्षेत आहे. भुर्गातील पाण्याची पातळी खालावत चालली आहे. तालुक्यातील वाडी तांड्यावर ग्रामस्थ घोटभर पाण्याच्या शोधात भटकंती करीत आहेत. पाऊस लांबल्याने रानोवनी नदिनाले कोरडे पडले आहेत. वनविभागाने जंगलात पाणवठे तयार केले असले तरी नैसर्गिक पाणवट्यावर प्राणी तहान भागवीत आहेत. पाणीपातळी घटल्याने वन्यजीव तहान व शिकारीच्या शोधात भटकंती करीत असल्याचे दिसून येत आहे.शहरात माकडे आणि वानराच्या टोळ्या गल्ली बोळात भटकंती करीत आहेत.येथील जंगलात अधूनमधून बिबट्याचा वावर सुरू असतो. ते आता मानवी वसाहती कडे येत असल्याचे दिसून येत आहे.गूरूवारी पहाटेच्या सुमारास धावरी येथील शेतकरी धोंडीबा कवळसे यांनी आपल्या शेतातील आखाड्यात नियमित प्रमाणे गूरढोर बांधली होती. पहाटेच्या सुमारास बिबट्यानी दिडवर्षाच्या गो-यावर हल्ला केल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतीक मोडवान यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल ज्ञानेश्वर धोंडगे, वनरक्षक एम.जे.पठाण यांनी घटणास्थळी भेट देऊन रितसर पंचनामा केला आहे.सदरील अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात आला असून लवकरच शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात येईल, अशी माहिती वनविभागाने दिली आहे. बिबट्याच्या हल्ल्याने परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत.

# आंतरराष्ट्रीय योग दिनी नऊवारीमध्ये योग प्रात्यक्षिके

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजपा महिला मोर्चातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनी गेट वे ऑफ इंडिया येथे बुधवारी सकाळी ९.०९ मिनिटांनी ९० महिलांनी नऊवारी नेसून अभिनव पद्धतीने योगासने सादर केली. भारताचा समृद्ध ठेवा योगसाधनेचे महत्व पटवून देण्यासाठी महाराष्ट्राचा पारंपरिक पेहराव नऊवारी नेसून याप्रसंगी ९ पॉवर योगासने सादर केली, अशी माहिती भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष व या कार्यक्रमाच्या प्रदेश संयोजक चित्रा वाघ यांनी दिली. यावेळी भाजपा सोशल मीडिया प्रदेश प्रभारी श्वेता शालिनी व महिला मोर्चाच्या प्रदेश पदाधिकारी उपस्थित होत्या. योग प्रशिक्षक संजय पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. श्रीमती वाघ म्हणाल्या की, धकाधकीच्या जीवनात निरोगी व तणावमुक्त रहाण्यासाठी योगसाधना गरजेची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी भारताचा समृद्ध ठेवा असलेल्या योगसाधनेला जगभरात पोहोचवले आणि त्यांच्या संकल्पनेतून जगभर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. मोदी सरकारला ९ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राबवल्या जाणा-या उपक्रमाअंतर्गत यंदा २१ जून रोजी योगदिनानिमित्त सर्व विधानसभा व लोकसभा मतदारसंघांमध्ये या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचेही श्रीमती चित्रा वाघ यांनी सांगितले. योग रील स्पर्धा यासह विविध कार्यक्रमांमध्ये राज्यभरातील भाजपा लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.







# दौलताबाद शाळेच्या मुख्याध्यापकपदी पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**प्रकाश लकडे**

**दौलताबाद :** देवगिरी विद्यालय शाळा दौलताबाद येथील नवीन प्रिन्सिपल म्हणून विराजमान झालेले मुख्याध्यापक पाटील सर आजी माझी विद्यार्थ्यांनी सरांना शुभेच्छा दिल्या. त्यावेळी उपस्थित सर्व शिक्षक चाटे सर राजू सर भदाणे, सर भालेराव मॅडम, राऊत मॅडम, इंगळे सर, मुळे सर, पोकळे, कोराने सर, नितीश लकडे, आकाश गोरे, राजू जाधव, रवी वाडेकर व शिक्षक उपस्थित होते तसेच गावकरी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# आंबेडकरी तरुणाच्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाई करा

## विभागीय आयुक्तालयावर धडकला क्रांती मोर्चा : राज्यपालांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रामध्ये मागील काही वर्षापासून आंबेडकरी समाजातील विशेष करुन बौध्द तरुण- तरुणींना जातीय द्वेषभावनेतून कधी भिम जयंती का काढली, रिंग ट्यून का वाजवली, शेतीच्या वादातून तसेच इतर कारणावरुन आंबेडकरी तरुणींवर जबरदस्तीने बलात्कार करुन खून करणे, केवळ जातीयद्वेष भावनेतून त्यांना टार्गेट करुन त्यांचे हत्याकांड करणे, असले प्रकार सातत्याने घडत आहे. पुरोगामी राज्यात काळीमा फासणारी ही घटना आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात मागील काहीवर्षापासून अशा २०० ते २५० घटना घडल्या आहेत. यातील आरोपींना कठोर शासन न झाल्याने जातीयवादी पिलावळीचे व मनुवाद्यांचे मनोधैर्य अधिक वाढले असून त्यांचेकडून महाराष्ट्रातील विविध विभागातील गावामध्ये मे व जून महिन्यामध्ये ७ ते ८ अत्याचार व हत्याकांडाच्या घटना घडल्या असल्याने त्याबाबत आंबेडकरी समाजामध्ये तिव्र असंतोष आहे. शासन, प्रशासन आंबेडकरी समाजास सरंक्षण देण्यास पूर्णतः अपयशी ठरले आहे. म्हणून, आमचे सरंक्षण आम्हीच करण्याची आमच्यावर वेळ आलेली आहे. तसेच, जातीयवाद्यांकडून सतत हल्ले होत असून त्याचा विरोध करण्यासाठी मोठया संख्येने रस्त्यावर उतरुन या जातीयवाद्यांना व सरकारला सळो की पळो केल्याशिवाय गत्यंतर नाही. तसेच, गेंडयाची कातडी अंगावर पांघरुन, झोपेचे सोंग घेतलेला सरकारला जागे करण्यासाठी आंबेडकरवादी संघर्ष समीतीच्या वतीने पुढील मागण्यांसदर्भात दि. १९ जून रोजी सकाळी ११.०० वा. भडकल गेट ते विभागीय आयुक्त कार्यालयावर क्रांती मार्च काढण्यात आला. पुढील मागण्याबाबतचे राज्यपाल यांना निवेदन विभागीय आयुक्त मार्फत देण्यात आले आहे. आंबेडकरी तरुण-तरुणींच्या हत्याकांडाबाबत दोषीवर कठोर कारवाईसाठी मा. विभागीय आयुक्तालयावर धडकला क्रांती मार्च..! मागण्या- औरंगाबाद जिल्हयातील मौजे खामगांव ता. फुलंब्री येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लावण्यात आलेल्या स्वागत कमान पाडणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. मौजे बाळापूर, ता. सिल्लोड येथील दलित वस्तीमध्ये समाज मंदिरास निळा कलर का लावला म्हणून तेथील सवर्णांनी बौध्द महिला, पुरुषांना जातीयवाचक शिवीगाळ करुन मारहाण केली असून त्याबाबत अजिंठा पोलीस स्टेशन येथे संबंधिताविरुध्द अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याची तक्रार देवूनही सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद भिंगारे यांनी गुन्हा दाखल न केल्याने त्यांना तात्काळ निलंबित करण्यात येवून सवर्णाविरुध्द ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. पीडित कुटूंबियास ५० लाखांची मदत




करावी. कुटूंबातील सदस्याला शासन सेवेत कायम स्वरुपी करण्यात यावे. ॲट्रासिटी गुन्ह्यातील आरोपीची मालमत्ता जप्त करावी. ॲट्रसिटीचे खटले जलद गती न्यायालयात अंडर ट्रायल चालविण्यात यावे. आंबेडकरी जनतेच्या सरंक्षणासाठी विनाअट शस्त्रे परवाने देण्यात यावे. अत्याचारीत गावात शासकीय निधी बंद करण्यात येवून सदरील गावे जातीयवादी म्हणून घोषित करण्यात यावे. महाराष्ट्रातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्हयाचा तपास सिआयडी / सीबीआय मार्फत करण्यात यावा. महाराष्ट्रातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपींना फाशीची शिक्षा होण्यासाठी विशेष वकीलाची नियुक्ती करण्यात यावी. सदरील क्रांती मार्चचे नेतृत्व समितीचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड यांनी केले असून जेष्ठ आंबेडकरवादी नेते रामराव दाभाडे यांनी निळा झेंडा दाखवून सुरुवात केली. यावेळी संजय ठोकळ, मनीष नरवडे, नानासाहेब शिंदे, वसंतराज वक्ते, भाई एस.एस जमधडे, किशोर गडकर, मोहनलाल गोरमे, अशोक गरुड, संतोष मोकळे, महेश तांबे, मिलिंद बनसोडे, नायबराव दाभाडे, मिलिंद मोकळे, प्रा. दिपक खिल्लारे, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, बाळू वाघमारे, पवन पवार, मुकुंद दाभाडे, संगीताबाई भालेराव, जयाताई गजभिये, करुणाताई पाटोळे, दादाराव आढावे, मिनाक्षी शिरसाट, विश्वनाथ दांडगे, मधुकर त्रिभुवन, सुनिल खरात, बलराज दाभाडे, बंटी सदाशिवे, मधुकर ठोंबरे, हिरालाल मगरे, सुदाम दांडगे, शेषराव दांडगे, राजु त्रिभुवन, विजय मोरे, संजय जाटवे, अंकुश शिंदे, नवल सुर्यवंशी, अमोल भालेराव, राजु म्हस्के, सुरज मगरे, राजु होर्शिळ, मगन खंडागळे, शांतीलाल लसगरे, मदन भगुरे, किशन फुलमाळी, एस पी मगरे, शेख रब्बानी, अनिल मगरे, संजय सातपुते, अरुण जाधव, रवि शिंदे, रमेश मगरे, राहुल भालेराव, सचिन गायकवाड, जयनाथ बोर्डे, दिपक शिंदे, दिलीप चाबुकस्वार, सर्जेराव भुईगड, प्रकाश निकम, बाळू भुजंग, नितीन सातपुते, प्रकाश जाधव, जी एस दोडवे, अशोक सोनवणे, प्रविण म्हस्के, आर्शिवाद रोडगे, अशोक गायकवाड, केशव मगरे, लक्ष्मण साळवे, जनक भालेराव, भाऊसाहेब दांडगे, विनोद दांडगे, रणजित दांडगे, सपना दांडगे, साधना दांडगे, गयाबाई भुजंग, कल्पना दांडगे, भिमराव दांडगे, विनोद दांडगे, बेबीबाई दांडगे, गौतम दांडगे, पारुबाई दांडगे, उषा दांडगे, कल्पना अंबादास दांडगे, लक्ष्मीकांत पिंपळे, सुनिल भटकर, मनोज कासारे, संदिप चादंणे, आदी समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते.



# जीआय-वन हॉस्पिटलमध्ये योग दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर:** जीआय-वन हॉस्पिटल येथे 21 जुलै रोजी जागतिक योग दिनानिमित्त पोट व लिव्हर विकारावर विजय मिळवण्यात योगाचे फायदे या विषयावर चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. जागतिक योग दिनचे औचित्य साधून जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्था छत्रपती संभाजीनगर मार्फत विविध कार्यक्रम घेण्यात आले. ज्याद्वारे आपले पोट व लिव्हरचे आरोग्य उत्तम राखण्याकरिता जीआय-वन हॉस्पिटल पोट व लिव्हर विकार संस्थेचे संचालक डॉ. वैभव गंजेवार, डॉ. अशोक मोहिते, डॉ. विनय झंवर, डॉ. संदिप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड, यांनी सर्वसामान्याना खालील संदेश दिला व आपले पोट व लिव्हर जपण्याकरिता आवाहन केले आहे. पोट व लिव्हरचे आरोग्य उत्तम असेल तरच आपण खऱ्या अर्थाने आनंदी राहून जीवनाचा परिपूर्ण आनंद लुटू शकतो याकरिता योगाचे किती महत्त्व आहे हे त्यांनी सांगीतले व दैनंदिन जीवनात आरोग्य व्यवस्थीत रहावे असे वाटत असेल तर रोज किमान एकतास व्यायाम आवश्यक आहे असे त्यांनी सांगीतले. जीआय-वन हॉस्पिटलचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला उस्फूर्त सहभाग नोंदवून योग दिवस साजरा केला.

# अमोल पाटील यांच्याकडून वारकऱ्यांना अन्नदान

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** पंढरपूरातील आषाडी वारिनिमित्त श्रीक्षेत्र जेजुरीत आलेल्या वारकऱ्यांसाठी पुणे येथील अमोल पाटील यांनी वारीतील ३००० वारकऱ्यांना अन्नदान व ५००० वारकऱ्यांसाठी बिस्कीट वाटप करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील पंढरपूरकडे प्रस्थान होणाऱ्या भाविक वारकऱ्यांसाठी अमोल पाटील यांनी वारकरी जेंव्हा श्री क्षेत्र जेजुरीत आले तेंव्हा त्यांनी कमीत कमी ३००० वारकऱ्यांसाठी अन्नदान कार्यक्रम आयोजित केला होता. याच बरोबरच त्यांनी कमीत कमी ५००० वारकरी महिला पुरुषांना मोफत बिस्कीट वाटप करण्याचे आयोजन केले. यापूर्वीही अमोल पाटील यांनी समाजामध्ये शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील गरजू व गरीब नागरिकांना वेळोवेळी मदत करून आपली सामाजिक बांधिलकीची जपली होती. असे हे अन्नदाते सामाजिक ऋण जपणारं माणुसकीचा साक्षात्कार अमोल पाटील यांनी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना पुढील वारीसाठीही शुभेच्छा दिल्या.



# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील केंद्र सावळदबारा येथे जय कालिका देवी शिक्षण संस्था संचलित शिवाजी। मा विद्यालय व उच्च माध्यमिक कै.लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील इंग्रजी प्राथमिक विद्यालय सावळदबारा येथे दि.१५/६/२३ रोजी शाळेची पहिली घंटा वाजली शिवाजी विद्यालयात शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली होती.कुठे फुलांच्या पायघड्या, रांगोळ्या, तर कुठे ढोल-ताशांच्या गजरात गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. ठिकठिकाणी विद्यार्थी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उन्हाळी सुटीनंतर दीड महिन्याने सोयगाव तालुक्यात पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक आणि खासगी अनुदानित शाळांची पहिली घंटा दि.15 /6 /23 रोजी वाजली जय कालिंका देवी शिक्षण संस्था सचिव सौ.रत्नाताई पंजाबराव कोलते,प्रा.एन आर कोलते व प्राथमिक मुख्याध्यापक विशाल खडके यांच्या हस्ते इयत्ता पहिली व चौथीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश, मिठाई व दफ्तर वाटप करण्यात आले.तर एकीकडे पूर्व विद्यालयामध्ये चिमुकल्यांची किलबिल... नवीन दप्तर... शाळेच्या



दरवाजात प्रवेश करताना थोडीशी भीती... हुरहुर असणारी लहान मुले, तर दुसरीकडे प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये वर्ग 5 वी च्या मुलांना सुद्धा शालेय साहित्य वाटप करण्यात आली विदयार्थना मित्र-मैत्रिणींना भेटण्याची लागलेली ओढ, मजा मस्ती... असे काहीसे चित्र शिवाजी विद्यालयात व सावळदबारा परिसरात शाळांमध्ये पाहायला मिळाले आहे. राज्य शासनाने यंदाच्या शैक्षणिक वर्षांपासून दप्तरांचे ओझे कमी करण्यासाठी पहिली ते आठवीच्या पुस्तकांमध्ये वह्यांची पाने जोडण्याचा अभिनव प्रकल्प राबविला आहे. एकत्रित विषयानुरूप एकात्मिक पुस्तकांची निर्मिती केली आहे. वह्यांच्या पानांमध्ये कशा प्रकारच्या नोंदी करायच्या आहेत याच्या सूचना शिक्षकांना प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांच्या कडून देण्यात आल्या आहे.अशी माहिती प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी बोलताना सांगितले.यावेळी शाळेचे प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील, संस्था अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील, बाबासाहेब कोलते, विकास पाटील, विजयसिंह राजपूत, भूषण देसले,सुदाम राठोड, पोपटराव सोनवणे, संजय जोशी, मुकुंदा व्यवहारे,अजाबराव राजपूत, गणेश मोहने, पंजाबराव शेळके, विजय जाधव शिक्षकवृंद, पालक, विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती गजानन चव्हाण यांनी दिली.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# महिलेच्या हाती एसटी बसचे स्टेअरिंग

## पहिली महिला चालक म्हणून वनिता मोरे वैजापूर आगारात रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** एसटी महामंडळात महिला चालकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून बुधवारी ( ता.२१ ) रोजी वैजापूर येथील महिला चालकाने प्रवासी वाहतूक करत वैजापूर ते गंगापूर या मार्गावर प्रवाशांनी भरलेली एसटी बस यशस्वीरित्या चालवत सेवा बजावली. छत्रपती संभाजीनगर विभागातील वैजापूर आगारात या ऐतिहासिक घटनेची नोंद झाली. या महिला चालकांनी ३०० दिवसांचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण केले असून त्यानंतर एसटी महामंडळाच्या समितीने त्यांची चाचणी घेतली. त्यात वनिता लक्ष्मण मोरे या महिला चालक उत्तीर्ण झाल्या. यानंतर ८० दिवसांचे सेवापूर्व प्रशिक्षणही त्यांना देण्यात आले. हे प्रशिक्षण ३ मे रोजी पूर्ण झाले. तर २२ मे रोजी अंतिम टेस्ट घेतल्यानंतर १ जून रोजी त्यांना रूजू करून घेण्यात आलेले आहे. एसटी महामंडळात कार्यालयीन पदांवर तसेच वाहक म्हणूनही महिला आपली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडत आहेत. यानंतर महामंडळाने चालक पदावरही महिलांना नियुक्त्या देण्यासाठी भरती केलेली आहे. विभागातील पाच महिलांची चालक पदासाठी निवड झालेली आहे. चालक वनिता मोरे या चालक आणि वाहक म्हणून वैजापूर आगारात रुजू झाल्या आहेत. सुरुवातीला त्यांना वाहक म्हणून कार्यभार सोपवला मात्र बुधवारी दि २१ जून रोजी त्यांच्या हाती वैजापूर गंगापूर फेरीसाठी बसचे स्टेअरिंग देण्यात आले. चालक म्हणून त्यांनी वैजापूर आगारात पहिला मान मिळवला आहे. वनिता मोरे -जगताप या विनायकनगर येथील राहिवासी असून त्यांचे माहेर हे तालुक्यातीलच भगूर हे आहे. त्यांचे शिक्षण हे करुणा निकेतन शाळेत तर महाविद्यालयीन शिक्षण विनायकराव पाटील महाविद्यालयात झाले आहे. तीन वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षातून त्यांनी एसटी महामंडळात स्वतःला सिद्ध केलंय. स्टेअरिंग हाती घेऊन वैजापूर बस स्थानकात आगारातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.





# जागतिक योग दिनानिमित्त वैजापुरात सायकल रॅली संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** जागतिक योग दिना निमित्त जलतरण व सायकलिंग ग्रुप वतीने वैजापूर शहरातून रॅली काढण्यात आली. वैजापूर भूषण व नगर परिषद चे माजी शिक्षणाधिकारी श्री.धोंडीराम सिंह ठाकुर यांनी सायकल रॅलीस शुभेच्छा योगाचे महत्व, सायकल चालविण्याचे फायदे, आनंददायी जलतरण मुळे शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी महत्व सांगितले. सायकल चालवा, आयुष्य वाढवा, आपण सारे पोहुया, निरोगी जीवन जगुया, देखना है कल, तो चलाओ सायकल, बिमारियो को रखना है दूर.. तो सायकल चलाओ जरूर, योगा करा, निरोगी रहा, सब रोगो का एक ही समाधान, योगा करो सुबह ऑर शाम अशा घोषणा देत सायकल रोटेगाव पर्यंत जावून नंतर नगर परिषद गार्डन मध्ये योग कार्यक्रमास हजर झाले. या रॅली मध्ये जलतरण व सायकल ग्रुप चे सर्वश्री.योगेश गाढे, अशोक तांबूस, धनंजय भावे साहेब , भास्कर खरात, वेदिका गाढे, शौर्य गाढे , जयराम खाडे, संदीप बनकर , प्रकाश मेमाने, धोंडिरामसिंह ठाकूर सर ,नामदेव चोरे, दिलीप अनर्थे, योगेश कुंदे, लक्ष्मण देवरे , सचिन लाडवाणी, कमलेश अधिकार, चरणसिंग काकरवाल, साहेबराव निकुले, किशोर वर्मा ,दशरथ बनकर, बाबासाहेब जगताप, ज्ञानेश्वर जाधव आदी सहभागी झाले. आभार प्रदर्शन दिलीप अनर्थे यांनी केले.

# ...तर अधिकाऱ्यांच्या कॅबिनमध्ये कांदा टाकतील

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** ह्या वर्षी कांद्याचे उत्पन्न चांगल्या प्रकारे झाले आहे. परंतु कांद्याला ३००ते४०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे. त्यामुळे उत्पादन खर्च सुद्धा निघाला नाही. महाराष्ट्र शासनाने मार्चमध्ये एक शासन निर्णय काढून फेब्रुवारी, मार्चमध्ये विकलेल्या कांद्याला प्रति किलो तीन रुपये ५० पैसे अनुदान जाहीर केले होते. परंतु तीन महिने उलटूनही एकाही शेतकऱ्याला हे अनुदान देण्यात आले नाही. जळगाव तालुक्यातील २२२० आणि संग्रामपूर तालुक्यातील ७४० शेतकऱ्यांनी रीतसर प्रस्ताव बाजार समितीमध्ये दाखल केले. तसेच सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान सुद्धा सत्तावीस हजार शेतकऱ्यांना अद्याप मिळाले नाही. हे दोन्ही प्रश्न पंधरा दिवसात मार्गी लागले नाही तर सर्व शेतकरी हे स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये कांदा आणून टाकतील, असा इशारा काँग्रेस ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष समाधान दामधर यांनी दिला. दिनांक २० जून रोजी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने प्रति किलो तीन रुपये ५० पैसे अनुदान मिळावे यासाठी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले ह्यावेळी ते बोलत होते. ह्यावेळी शेतकऱ्यांनी पिशव्यांमध्ये भरून आणलेला कांदा तहसीलदारांना सुपुर्द केला.

सदर निवेदनाच्या प्रतिकृती कृषीमंत्र्यांसह जिल्हाधिकाऱ्यांना सुद्धा निर्गमित करण्यात आल्या आहेत. हे निवेदन देतेवेळी प्रदेश काँग्रेस सचिव डॉ. स्वाती वाकेकर, काँग्रेस ओबीसी सेल जिल्हा कार्याध्यक्ष समाधान दामधर, ओबीसी सेल प्रदेश उपाध्यक्ष राजीव घुटे,शहराध्यक्ष अर्जुन घोलप,बालगजानन पाटील, एम आसिफ इकबाल, श्रीकृष्ण केदार,डॉ. प्रशांत राजपूत, प्रवीण भोपळे, प्रमोद तितरे, सय्यद हुसेन राही, रामकृष्ण धुळे, अनिल इंगळे, महेंद्र बोडके, ज्ञानदेव राजनकर, दिनेश ढगे, नितीन जाधव, कौशल्य ढगे, विनोद धंदर, एजाज शहा, अमोल भगत यांचे सह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांची लक्षणे उपस्थिती होती ह्यावेळी शेतकऱ्यांनी पिशव्या भरून कांदे तहसील विभागाच्या स्वाधीन केले.



# कुख्यात गुंडांना पिस्तूलसह अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पिस्तूल घेऊन कुणाचा तरी खून करण्याच्या तयारीत असलेल्या युवकासह पिस्तूल विक्री करणाऱ्याला गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. पोलिसांनी पिस्तूल आणि मॅग्झिन जप्त केली. परविंदरसिंह प्रीतमसिंह घट्टरोडे ( २३, बाबा दीपसिंगनगर ) आणि मॉरिस एरिस्वामी फ्रांसीस ( मोहननगर, खलासी लाईन ) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परविंदरसिंह घट्टरोडे हा कुख्यात गुंड असून त्याचे नुकताच एका टोळीशी वाद झाला होता. हद्दीच्या वादातून त्या टोळीतील एकाने परविंदरसिंहला धमकी दिली होती. त्यामुळे त्या युवकाचा काटा काढण्याच्या कट त्याने रचला. त्याने मॉरिस फ्रॉन्सीस याच्याकडून ५० हजार रुपयांत विदेशी बनावटीची पिस्तूल विकत घेतली. बुधवारी दुपारी साडेतीन वाजता तो पिस्तूल घेऊन प्रतिस्पर्ध्याच्या टोळीतील सदस्याला धडा शिकविण्यासाठी जात होता. ही माहिती गुन्हे शाखेच्या पथक दोनचे प्रमुख पोलीस निरीक्षक राहुल शिरे यांना यांना मिळाली. त्यांनी लगेच सहायक निरीक्षक गणेश पवार यांच्या पथकाला सापळा रचण्यास सांगितले. पोलिसांनी कपिलनगरात सापळा रचला. परविंदरसिंह तेथे येताच पोलिसांनी त्याच्यावर झडप घातली. त्याच्या पाठीमागे लपविलेली पिस्तूल आणि मॅग्झिन पोलिसांनी जप्त केले. ही कारवाई पोलीस उपायुक्त मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख राहुल शिरे, गणेश पवार, गजानन कुबडे, प्रवीण शेळके, महेंद्र सेडमाके, दिनेश डवरे, आशिष वानखडे, सुनील कुवर यांनी केली.

# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूलमध्ये योग दिन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथे 21 जून रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे शाळेतील मुले व मुली तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी योग साधना व प्राणायाम काळाची गरज ओळखून या राष्ट्रीय समारंभामध्ये अतिशय उत्साहाने व कार्य तत्परतेने सहभाग घेऊन हा कार्यक्रम शाळेत मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश वेताळ, शिवाजी पडोळे, यांनी मुलांना योग योग्य पद्धतीने करण्यासाठी सहकार्य केले व योगशिक्षकांची भूमिका निभावली. शाळेचे मुख्याध्यापक यांनी योगाचे महत्त्व विशद करताना योगा आता जीवनाचा अविभाज्य भाग व्हायला हवा. अनादी काळापासून साधुसंतांनी योगाचे महत्त्व पटवून दिले, धकाधकीच्या जीवनात योगा गरजेचे आहे. त्याशिवाय रोगमुक्त विद्यार्थी व भारत हे सूत्रच आता आपण मुलांमध्ये रुजवायला हवे स्कॉलर विद्यार्थी निर्माण करायचे असतील तर विद्यार्थ्यांनी सुद्धा योग आत्मसात करून योग साधने शी एकनिष्ठ व्हावे व योग करावा, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी यशवंत पाटील, शांताराम कापडणे, आर. आर. पवार, विश्वास नीळ, मंजुनाथ भवरे, डॉक्टर बाळासाहेब निंभोरे, किरण ताकटे, राजू बनसोडे, संतोष शिंदे, संजय देवकर, दत्तू गायकवाड, भरत काळे, रामदास जाधव, रंजनाताई गायकवाड हे उपस्थित होते.



# फुलंब्री तहसीलदारपदी डॉ. कृष्णा कानगुले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील तहसीलदार डॉ. शीतल राजपूत यांची बदली झाली असून, त्यांच्या जागी डॉ. कृष्णा कानगुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. कानगुले यांनी सोमवारी दुपारी पदभार स्वीकारला. या वेळी कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. फुलंब्री येथील तहसीलदार डॉ. शीतल राजपूत या गेल्या अडीच वर्षांपासून कार्यरत होत्या. त्यांचा ६ महिन्यांचा कार्यकाळ बाकी असताना त्यांची बदली करण्यात आली असून, त्यांना अद्याप कोठेही नियुक्ती देण्यात आलेली नाही. त्यांच्या जागी औंढा नागनाथ येथील तहसीलदार डॉ. कृष्णा कानगुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




# फुलंब्रीत अवैध धंदे बोकाळले

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** पोलिसांच्या आशीर्वादाने चालू असलेले अवैध धंदे, तीन चाकी आटो रिक्षा औरंगाबाद टी पॉईंट ते फुलंब्री टी पॉईंटपर्यंत व तसेच सिल्लोड रोडवरील जतेगाव, धामणगाव, पिरबावडा, टाकळी, डोंगरगावसह फारशी अळंद वडोद बाजार या रोडवरील जवळपास 100 ते 150 आटो रिक्षा तब्बल 10 ते 12 प्रवाशी घेऊन धावतात. असे की औरंगाबाद टी पॉइंड ते फुलंब्री टी पॉइंड पर्यंत तीन चाकी आटो रिक्षा आला 3 सीट चा परवाना असतो परंतु ट्राफिक पोलीसांच्या समोर 10 ते12अवैध प्रवाशी घेऊन जातात व प्रवाशयांच्या जीवाशी खेळतात. हा सर्व प्रकार ट्राफिक पोलिस व संबंधित आधीकाऱ्यांच्या नजरेसमोर खुलेआम चालतात कारण की सबंधीत अधिकाऱ्याला या अवैध वाहतूक करणारे तीन चाकी आटो रिक्षावाल्याकडून प्रत्यक महिन्याला एका रिक्षा वाल्याकळून 500 रूपे हप्ता म्हणून मिळतो. म्हणून ह्या अवैध प्रवाशी वहातुक करणारे तीन चाकी आटो रिक्षावर कार्यवाही होत नाही, अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. असे की सदर अवैध वाहतुकी करणारे आटो रिक्षा ड्रायव्हर कळे वहाण चालवण्याचा परवाना सुद्दा नाही व तसेच वाहनाचे पेपर व आरसी देखील नसतांना खुलेआम पोलीस प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांचे नजरे समोर धावतात अशी नागरिकांत चर्चा आहेत, चार संबंधित अधिकारी कारवाई करणार का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे.

# 'प्रकाशयात्री : डॉ.मुरहरी केळे' गौरवग्रंथाचे शनिवारी प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ऊर्जा क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे अभियंता, साहित्यिक तथा मराठवाड्याचे भूमिपुत्र डॉ. मुरहरी केळे यांच्या व्यक्तिमत्त्वावरील 'प्रकाशयात्री - डॉ. मुरहरी केळे' या गौरवग्रंथाचे प्रकाशन 24 जूनला ( शनिवारी ) सायंकाळी 5.30 वाजता होणार आहे.

एमजीएम विद्यापीठ परिसरातील आर्यभट्ट सभागृहात आयोजित या सोहळ्याचे अध्यक्षस्थान मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे भूषवणार असून, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी तथा साहित्यिक इंद्रजित भालेराव तसेच दैनिक सकाळच्या मराठवाडा आवृत्तीचे निवासी संपादक दयानंद माने यांची उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्यास महावितरणच्या प्रादेशिक कार्यालय औरंगाबादचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास सर्व साहित्यप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन या ग्रंथाचे संपादक डॉ.शिवाजी तिकांडे, सहसंपादक दत्ता किवने यांच्यासह गौरवग्रंथ प्रकाशन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# खुलताबाद तालुक्यामध्ये योग दिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या संकल्पनेतून संपूर्ण देशात 21 जुन हा दिवस योगदिन म्हणून साजरा केला जातो याच अनुषंगाने रत्नपुर-खुलताबाद तालुक्यात विविध ठिकाणी योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. धामणगाव, खुलताबाद, तिसगाव, बाजारसावंगी,ताजनापुर, सुलतानपुर, गदाना,वेरूळ अशा विविध ठिकाणी योगदिन साजरा करण्यात आला या योगदिनानिमित्त स्वामी भरतगिरीजी महाराज, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, जि.प उपाध्यक्ष एल.जी.गायकवाड, योगदिन प्रमुख विकास कापसे, दिनेश अंभोरे,सुरेश मरकड, योगेश बारगळ, परसराम बारगळ, ज्ञानेश्वर नलावडे,प्रकाश चव्हाण, गणेश हजारी,अंकुश काळे, गणेश काळे, अनिल करपे, किरण बोडखे, सोमिनाथ तुरेवाले,राजेंद्र राठोड,शरद गावंडे,तसेच तालुक्यातील सर्व शिक्षक , विद्यार्थी,व गावातील नागरिक योगदिनास उपस्थित होते.

# योग केल्याने शरीराला संजीवनी मिळते

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** भारतीय प्राचीन संस्कृती परंपरा यामध्ये योग साधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अदिम काळापासून ऋषीमुनींनी, साधुसंतांनी योगाचे महत्त्व पटवून दिले, आजच्या धकाधकीच्या जीवनात योगा गरजेचे आहे. योगाने शरीराला संजीवनी मिळते असे प्रतिपादन तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बी.आर. पांचाळ यांनी बुधवारी (ता .२१) केले आहे. येथील ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल येथे योग दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून योग गुरु डॉक्टर विजयकुमार दंडे, योग प्रशिक्षका धम्मशिला दंडे, संस्थापिका श्रीमती अर्चना कदम, मुख्याद्दापक भाऊसाहेब दांडेकर, सहशिक्षक विजय गोरटकर,रामराव कळसकर, राजेश वाघमारे, शंकर कदम, महेश नारलावार, सूनील मूरगुलवार, विकास क्षिरसागर, सतीष देशमुख, दयानंद गुंडेराव,अरूण डोईफोडे याची उपस्थिती होती. पांचाळ म्हणाले की, जगभरातील देशांनी योग स्वीकारला आहे. अनेक देशात योग दिन साजरा होतो पाच हजार वर्षापूर्वीची परंपरा भारताला आहे.

शरीर, मन, समाज आरोग्यासाठी योगा महत्त्वाचा आहे असे सांगितले, येथील युथीकायोगा अँड वेलनेस सेंटर येथे सकाळी सहा वाजता योगाचार्य डॉ. विजयकुमार दंडे यांनी विद्यार्थ्यासमोर प्रात्यक्षिक सादर केले.

# सेंट जॉन इंग्लिश शाळेत अंतरराष्ट्रीय योगा दिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शैक्षणिक विकासाबरोबर शारिरीक व मानसिक विकास विद्यार्थ्यांचा व्हावा यासाठी सेंट जॉन इंग्लिश हायस्कूल शाळेत जागतिक योगा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. धकाधकीच्या आणि तणावाच्या जीवनामध्ये आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी योगा करने खूप गरजेचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांना योगाचा अभ्यास करणे अतिशय गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी शाळेच्या प्रांगणात योगाचे प्राणायाम, पदमासन, गरुडासन असे अनेक आसनांचे प्रात्यक्षिक केले. कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अर्पना जीरवनकर व शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा देशपांडे यांची उपस्थिती होती. डॉ. अर्पना जीरवनकर यांनी योगा का ? कसा करावा यासाठी मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्यध्यापिकानी सर्वांनी योगा करणे हि नित्याची सवय करावी असा सल्ला दिला. शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचे संस्थेचे सचिव जेम्स डोंगरदिवे, शाळेच्या संचलिका पल्लवी डोंगरदिवे व शाळेचे मुख्य गटसमन्वयक आकाश सरकटे शालेय विकास प्रमुख नमिता पार्थसारथी यांनी जागतिक योगा दिनानिमित्त शुभेच्छा देऊन विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर